क्रमांक :- १३८

महाराष्ट्र विधानसभा

पत्रक भाग – दोन

गुरुवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२६ / कार्तिक ७, १९४८ शके

१३८ . लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-

विधानसभेचे सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ३० जून, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय (पावसाळी) अधिवेशनात एकूण ३५९ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. ३५९ निवेदनांपैकी २६ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण ३३३ निवेदनांपैकी १६९ निवेदने सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक १२२ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित १६४ निवेदनांपैकी ११८ निवेदने गुरुवार, दिनांक २९ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ७ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित ४६ निवेदनांपैकी १५ निवेदने गुरुवार, दिनांक २३ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ७० अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता ३१ निवेदनापैंकी २७ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून पत्रक भाग – २ वितरीत करेपर्यंत प्राप्त होणारी निवेदने समाविष्ट करुन या सचिवालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. उर्वरित ४ प्रलंबित निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,
मुंबई
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२६

मेघना तळेकर
सचिव-२,
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :-

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
१०) संगणक कक्ष (WEBSITE)
११) एम. के. सी. एल.
१२) प्रतिवेदन कक्ष

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. समाधान महादेव आवताडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३९८ पुढीलप्रमाणे आहे.:-

" राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, या योजनांमधून राज्यातील गरीब व सर्वसामान्य लोकांना मोफत उपचार करण्यात येत असणे, या योजनेतंर्गत १३५६ आजारांपैकी ११९ आजारावर उपचार करण्यात येणे, हे खाजगी रुग्णालयात न होता केवळ शासकीय रुग्णालयात राखीव ठेवले असणे, त्याचबरोबर राज्यातील गरीब, सर्वसामान्य विशेषकरुन गरोदर महिलांच्या डिलेव्हरी, संर्पदंश उपचार, हार्निया, अपेंडिक्स, पित्ताशयाचे खडे, महिलांची पिशवी काढणे हे सर्वसामान्यांचे आजार असणे, पावसाळयात सर्पदंशाच्या घटना मोठया प्रमाणात घडत असणे, सर्पदंशानंतर ग्रामीण भागातील खासगी रुग्णालयात ॲडमीट करावे लागत असणे, कारण मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून सर्पदंश झालेल्या रुग्णाला प्रामुख्याने शेतक-यांना मृत्यु ओढविल्यास दोन लाख रुपये मदतनिधी मिळणे परंतु सर्पदंश उपचाराकरिता एक रुपयाही मिळत नसल्याने सर्पदंश झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांची आर्थिक गैरसोय होणे, काही वेळा ग्रामीण रुग्णालयात औषधे उपलब्ध नसणे, शासकीय रुग्णालय हे दूरवर असणे, विषारी प्रजातीचा साप चावला तर महागडी इंजेक्शन द्यावी लागत असल्याने बहुतेक वेळा रुग्णांचा मृत्यु होत असल्याने सर्पदंशावर उपचाराकरिता पैसे मिळत नसल्याने शेतक-यांमध्ये निर्माण झालेली चिड व भिती लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण यांचे निवेदन

राज्यात एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना दिनांक 01 जुलै, 2024 पासून महाराष्ट्रातील सर्व नागरिकांसाठी कोणत्याही उत्पन्नाच्या अटीविना रोखरक्कम विरहीत (कॅशलेस) स्वरूपात राबविण्याचा निर्णय दिनांक 28 जुलै, 2023 रोजी घेण्यात आला असून त्यामध्ये 1356 उपचारांचा समावेश करण्यात आला होता. त्यापैकी ११९ उपचार शासकीय रुग्णालयांकरिता राखीव ठेवण्यात आले होते. यामध्ये सर्पदंश उपचार, हर्निया, अपेंडिक्स, पित्ताशयाचे खडे, महिलांची पिशवी काढणे इत्यादि उपचारांचा समावेश करण्यात आलेला होता. गरोदर महिलांच्या साधारण डिलेव्हरीच्या उपचाराचा समावेश सेवा जननी शिशु सुरक्षा योजनेमध्ये उपलब्ध असून बाळंतपणाच्या गुंतागुंतीसाठी एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार उपलब्ध आहेत.

एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. 5 लक्ष रकमेचे संरक्षण देण्यात येत असून लाभार्थ्यांच्या उपचाराबाबत दाव्यापोटी सादर केलेली रक्कम अंगीकृत रुग्णालयास अदा करण्यात येते.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. ४/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचारांच्या संखेमध्ये वाढ करण्यात आली असून त्यामध्ये आता एकुण 38 विशेषज्ञ सेवांतर्गत 2399 उपचांराचा समावेश करण्यात आला असून त्यापैकी २२३ उपचार शासकीय रुग्णालयांकरिता राखीव ठेवण्यात

आले आहेत. त्यानुसार सर्पदंश उपचाराचा समावेश योजनेअंतर्गत सर्व अंगिकृत रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून दिला जाणार आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९९८ पुढीलप्रमाणे आहे.:-

" सरळगाव, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील छत्रपती माध्यमिक विद्यालय तसेच कृषी व कृषी संलग्न विविध महाविद्यालये असून त्याठिकाणी हजारो विद्यार्थीनी/विद्यार्थी शिक्षण घेत असणे, महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दार शेजरी मुख्य रस्त्याच्या बाजूला अनधिकृतपणे एक भंगारचे दुकान सुरु असणे, सदर ठिकाणी गावो-गावी जाऊन जमा करण्यात आलेले भंगार साहित्य, कचरा साठवण्यात येणे, सदर भंगारचे दुकान एका परप्रांतीयाकडून चालवण्यात येत असून त्याठिकाणी भंगार साहित्य, कचयाचा डोंगर तयार होणे, परिणामी परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरुन विद्यार्थी व शिक्षकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच सदर ठिकाणी गर्दुले, गलिच्छ व्यक्तींचा वावर वाढल्यामुळे विद्यार्थ्यांच्या विशेषत: विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे, याबाबत महाविद्याल, विद्यार्थी, पालक यांच्याकडून वारंवार संबंधित दुकानदाराला समजवण्याचा प्रयत्न करुनही त्याच्याकडून कोणत्याच उपाययोजना न येणे, उक्त प्रकरणी संबधित तहसीलदार, पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी करुन सदर भंगार दुकान सदर ठिकाणाहून इतरत्र हलविण्याबाबत विनंती करण्यात येणे, तथापि अद्याप उक्त प्रकरणी कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी विद्यार्थ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून त्यांच्यात वाढते असुरक्षिततेचे वातावरण, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन सदरचे भंगार दुकान इतरत्र हलविण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याच्या सुचना संबंधितांना देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

मा. मुख्यमंत्री, यांचे निवेदन

ठाणे ग्रामीण जिल्हयाचे मुरबाड पोलीस ठाणे हद्दीतील सरळगांव येथील छत्रपती माध्यमिक विद्यालय तसेच कृषी महाविद्यालयाच्या सहा विभागांनी दिनांक ०८/०४/२०२३ रोजी एकूण ६ तक्रारी अर्ज हे महाविद्यालयाचे रस्त्यावरील भंगारवाल्याचे अनधिकृत मोठे दुकान इतरत्र हलविणे संदर्भात मुरबाड पोलीस ठाण्यास प्राप्त झाल्या होत्या. सदर अर्जांच्या अनुषंगाने मुरबाड पोलीस ठाणे यांनी सदर विषय हा ग्रामपंचायत विभागाशी संबंधित असल्याने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुरबाड यांचेकडे पुढील कार्यवाहीकरीता जावक क्र.१२१२/२०२३ दिनांक १२/५/२०२३ अन्वये वर्ग करण्यात आला आहे. तसेच त्याबाबत अर्जदार यांना सुचनापत्रादवारे कळविण्यात आले असून त्यानंतर सन २०२४ ते आजपावेतो सदर प्रकरणी पोलीस विभागास तक्रार अर्ज प्राप्त नाही.ग्रामपंचायत सरलगाव येथील छत्रपती माध्यमिक विद्यालय तसेच कृषी महाविद्यालयाच्या जवळील रस्त्यालागत भंगारवाल्याचे अनधिकृत मोठे दुकान श्री. सुधाकर घुडे रा. सरळगाव यांच्या घराच्या अंगणात श्री. राजू तिलकराम यादव हे घर भाड्याने घेऊन भंगारचा व्यवसाय करीत आहेत. याप्रकरणी पोलिस विभाग, मुरबाड यांनी दिनांक २७/०३/२०२३ रोजी कळविलेनुसार ग्रामपंचायत, सरळगाव यांना दि. ०९/०८/२०२३ व दि. ०४/११/२०२३ रोजी संबंधित घरमालक श्री. सुधाकर घुडे यांना लेखी पत्र देऊन भंगार व्यवसायाचे दुकान महाविद्यालय परिसरातून हटविण्याबाबत कळविण्यात आले होते.

दिनांक ०२/०७/२०२५ रोजी ग्रामपंचायत कमिटी, मंडळ अधिकारी, पोलिस, विस्तार अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांनी समक्ष जागेवर जाऊन संबंधित भंगारवाला यांना भंगाराचे साहित्य इतरत्र हलविण्याच्या सूचना केल्या असता त्याने सदर भंगाराचे ५०% साहित्य इतरत्र हलविले असून उर्वरित भंगार साहित्य हटविण्याबाबत कार्यवाही होत आहे.सदर परिसरात गर्दुले व गलीच्छ व्यक्तींचा वावर आढळून आले नाही.

.....

लक्षवेधी सूचना क्र.२०१८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पाववाळी) अधिवेशन

श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०१८ पुढीलप्रमाणे आहे:-

"आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढपूरला दर्शनासाठी जात असलेल्या अल्पवयीन मुलीच्या गळ्याला कोयता लावून धाक दाखवत अतिप्रसंग केल्याची दिनांक ३० जून, २०२५ रोजी पहाटे ४ च्या सुमारास घडलेली दुर्दैवी घटना, दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली गावाजवळ चहा पिण्यासाठी थांबले असताना काही नराधमांनी मिरची पुड फेकून व कोयत्याचा धाक दाखवून महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लुटणे, एव्हढेच नाही तर त्यातील एका अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करण्याचा झालेला प्रयत्न, पंढरीच्या वारी मार्गावर असा अमानुष प्रकार घडल्याने वारीमध्ये सामील होत असलेल्या महिलांच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला प्रश्न, परिणामी वारकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, अद्यापही आरोपींना पकडण्यात आलेले अपयश, त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला दर्शनासाठी जात असताना कोयत्याचा धाक दाखवून महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागीने लुटणे व त्यातील एका अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग केल्याप्रकरणी दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु. र. क्र. ४४८/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ६४, ३०९(६), ३५१(२), ३(५), ७५, ७६, ३०९(४) सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६, ८, १२ सह शस्त्र अधिनियम, १९५९ चे कलम ४,२५ अन्वये दिनांक ३०.०६.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच दिनांक २९.०८.२०२५ रोजी दोन्ही आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

राज्यात महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

१) राज्यात महिलांवर होणा-या अत्याचाराचा तातडीने निपटारा होण्यासाठी सर्व आयुक्तालय व जिल्ह्यामध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला पोलीस कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

२) जिल्हा/आयुक्तालय तसेच पोलीस स्टेशन पातळीवर महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

३) बलात्कारासारख्या गुन्हयांचा तपास जलद गतीने व्हावा व त्यास आळा बसावा म्हणून पोलीस महासंचालकांद्वारे सर्व घटक प्रमुखांना वेळोवेळी मार्गदर्शक सूचना देऊन संवेदनशीलता निर्माण केली जाते.

४) महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी राज्यात एकूण ४५ पोलीस घटकांमध्ये "अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष" स्थापन करण्यात आले आहेत.

५) पिडीत महिलांच्या सहाय्यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत पोलीस स्टेशनच्या आवारात महिला समुपदेशन कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

६) डायल ११२ या हेल्पलाईनच्या माध्यमातून महिला व बालकांचा लैंगिक छळ, ॲसिड हल्ला, घरगुती हिंसाचार, विनयभंग, बालविवाह, पोर्नोग्राफी इत्यादि विषयाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तात्काळ मदत पुरविण्यात येते.

७) महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

८) महाराष्ट्र राज्यात प्रि-पेड टॅक्सी सेवा पुरविणा-या उबेर, ओला अशा प्रकारच्या टॅक्सींमध्ये प्रवास करणा-या महिलांच्या सुरक्षिततेसाठी "Panic Button" ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

९) राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीतील शाळा, महाविद्यालयांमध्ये पोलीस काका/पोलीस दिदी पथक भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक अत्याचार, छेडछाड, गुड टच/बॅड टच, सायबर सुरक्षा, अंमली पदार्थ विरोधात जनजागृती निर्माण करतात.

लक्षवेधी सूचना क्र. २२२९

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२२९ पुढीलप्रमाणे आहे :-

"माझ्या मतदार संघातील मौजे कु-हा, ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव येथील शिवाजी हायस्कूलच्या हलगर्जीपणा व दुर्लक्षामुळे दि.७.७.२०२५ रोजीच्या सुमारास इयत्ता ७ वी च्या अल्पवयीन विद्यार्थीनी कु.सुरळकर हिचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना घडणे, सुदैवाने शोध मोहिमेतून विद्यार्थीनी शाळेच्या पाठीमागे हातपाय बांधलेल्या स्थितीत डांबून ठेवल्याचे उघडकीस येणे, या घटनेमुळे राज्यभरातील विद्यार्थीनीमध्ये दहशतीचे व घबराटीचे वातावरण निर्माण होणे, या घटनेतील आरोपी शाळेच्या सी.सी.टि.व्ही. फुटेजमध्ये आलेले असतांना शाळेतर्फे पोलिसांना तपासात सहकार्य न करता लाईट नसल्याने कॅमेरे बंद असल्याचे सांगून उडवाउडवीची उत्तरे देत असून संबधित विद्यार्थीनीच्या पालकांनी काही दिवसापूर्वीच सदरील शाळेच्या मुख्याध्यापकांना व संचालक मंडळा अशी घटना घडू शकण्याच्या सूचना देऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेविषयी काळजी घ्यावी, असे सूचित केलेले असतांना शाळेचे संचालक व मुख्याध्यापक यांनी कोणतीच सुरक्षा व काळजी न घेतल्याने सदरील घटना घडणे, या घटनेमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने संबधित शाळेच्या संचालक व मुख्याध्यापकांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ००."

मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

मौजे कु-हा, ता. मुक्ताईनगर येथील शिवाजी हायस्कूल येथे अल्पवयीन पीडिता व वर्गातील मुली शाळेतील पटांगणात खेळत असताना त्यांच्यात व आरोपी विधिसंघर्षीत मुले यांच्यात लगोरीचा बॉल लागल्याने वाद झाला. त्यानंतर यातील आरोपी क्र. १ व २ विधिसंघर्षीत बालक यांनी पीडित

मुलीचा शाळेच्या आवारात पाठलाग केल्याप्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाणे, जळगाव येथे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७८, ३(५) सह लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १२ अन्वये दिनांक ०८.०७.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपी क्र. १ यास दिनांक १०.०७.२०२५ रोजी आरोपीस अटक करण्यात आली होती व दिनांक ०२.०८.२०२५ रोजी मा. न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. तसेच दिनांक ३०.०८.२०२५ रोजी आरोपी क्र. १ विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच या गुन्ह्यातील आरोपी क्र.२ व ३ हे विधिसंघर्षीत बालक असून त्यांना मा. बाल न्याय मंडळासमोर हजर केले होते व त्यांचेविरुद्ध मा. बाल न्याय मंडळ, जळगाव येथे दिनांक ३०.०८.२०२५ रोजी ज्युवेनाईल दोषारोप दाखल करण्यात आले आहे.

तसेच या प्रकरणी पीडितेचे अनोळखी तीन इसमांनी अपहरण करून तिला डांबवून ठेवल्याची घटना खोटी असल्याचे तपासात निष्पन्न झाली आहे.

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे
द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
मा.अबू आझमी, विधानसभा सदस्य

लक्षवेधी सूचना क्र.२२७६

सार्वजनिक न्यास विभाग मुंबई कार्यालयातील अनेक सामाजीक संस्था ट्रस्ट मध्ये मौठ्या प्रमाणावरती गैरव्यवहार गैरकारभार चालु असल्याचे निदर्शनास येऊनही कुठलीही ठोस कारवाई होत नसल्याचे नागरी तक्रारी असतांना परळ, मुंबई येथील अखिल हिंद भावसार महाजनवाडी बोर्डींग ट्रस्ट मध्ये गेली कित्येक वर्ष गैरकारभार चालु असणे, याबाबत समाजातील जागरुक नागरीकांनी दिनांक १६ जुलै, २०१३ पासून ते आजपर्यंत पत्रान्वये तक्रारी दिलेल्या असणे, संस्थेचा कारभार हा गैरकायदेशीर व गैरकारभारातुन चालु असुन अखिल हिंद भावसार महाजनवाडी बोर्डिंग ट्रस्ट यांच्या ऑडिट रिपोर्टमध्ये दुसऱ्या तीन चार संस्थेचे ऑडिट रिपोर्ट लावण्यात आलेले असणे, या संस्थेची दोन करोडची एफडी परस्पर कर्नाटक राज्यात स्थलांतरीत केलेली असणे, सद्या मुळ ट्रस्टी दोनच असून इतर बनाबट कायदेशीर नसलेले ट्रस्टी हे बनावट कारभार चालवत असणे, वेळोवेळी चेंज रिपोर्टमध्ये तफावत आलेली असून अजुनपर्यंत कुठलीही कायदेशीर ट्रस्टी सदर संस्थेवरती नेमणुका झालेल्या नसल्यामुळे गैरकायदेशीर बोगस संस्था चालकाने अखिल हिंद भावसार महाजनवाडी ट्रस्टमध्ये वीस कोटीचा गैरव्यवहार केलेला दिसुन आल्याने संबंधितांवरती गुन्हे दाखल करणेबाबत तक्रारी असतांना सार्वजनिक न्यास विभाग ही कुठलीही ठोस कारवाई करत नसणे, या संबंधित सामाजिक संस्थेवरती गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी धर्मादाय उपायुक्त व निरीक्षक यांच्याकडुन गैरकारभाराची पडताळणी होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

विधि व न्याय विभाग

मा. मुख्यमंत्री (श्री देवेंद्र फडणवीस) यांचे निवेदन

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, मुंबई या कार्यालयात अनेक सामाजिक संस्था नोंदणीकृत आहेत. ज्या संस्थेमध्ये गैरव्यवहार, गैरकारभार होत आहे, त्या संस्थेचे हितचिंतक, लाभाधिकारी व्यक्ती यांनी तक्रार केली असता, कार्यालयातील निरीक्षक यांचेमार्फत योग्य ती चौकशी करून निरीक्षक अहवाल संबंधित पीठासन अधिकारी यांना सादर केल्यानंतर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त नियम, १९५१ अन्वये कारवाई करण्यात येते. तसेच नोंदणीकृत न्यासाच्या विश्वस्तांविरोधात तक्रार प्राप्त झाली तर त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० नुसार कार्यवाही करण्यात येते.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, मुंबई कार्यालयात ऑल इंडिया भावसार क्षत्रिय गहाजनवाडी ॲन्ड बोर्डिंग ट्रस्ट, नोदणी क्रमांक A-१७३/मुंबई या नावाने संस्था नोंदणीकृत आहे. या न्यासाच्या गैरव्यवहार, गैरकारभाराबाबत दिनांक १६ जुलै, २०१३ पासून ते आजपर्यंत निरीक्षक अथवा धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे तक्रार प्रलंबित नाही. परंतु दिनांक ०४/०७/२०२५ रोजी श्री. मोहन दशरथ कटारे यांनी या संस्थेच्या विरुध्द धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे

तक्रार (तक्रार क्र. DYCC/१२७०/२०२५) दाखल केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने न्यायालयीन चौकशी सुरु असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

ऑल इंडिया भावसार क्षत्रिय महाज्ञनवाडी ॲन्ड बोर्डिंग ट्रस्ट, मुंबई या संस्थेच्या संकेतस्थळावरील माहितीअनुसार न्यासाने सन २०१७-१८ ते २०२१-२०२२ पर्यंतचे ऑनलाईन हिशोबपत्रके दाखल केलेली आहेत. हिशोब पत्रकावरून न्यासाने रुपये दोन कोटींची एफडी (मुदत ठेव) परस्पर कर्नाटक राज्यात स्थलांतरित केल्याचे दिसून येत नाही. सध्या कायदेशीर ट्रस्टीबाबतचे सन २००६ ते २०१८ पर्यंतचे दाखल चेंज रिपोर्ट न्यायप्रविष्ठ आहेत. या संस्थेमध्ये बोगस संस्था चालकाने गैरकायदेशीरपणे वीस कोटीचा गैरव्यवहार केल्याचे न्यासाचे हिशोबपत्रकातील परिशिष्ट-०९ वरून दिसून येत नाही.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पाववाळी) अधिवेशन

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०१८ पुढीलप्रमाणे आहे:-

"चंद्रपूर जिल्ह्यातील शेगाव (बु) पोलिस स्टेशन अंतर्गत येणा-या अल्पवयीन मुलीवर चिमूर-मासळ मार्गावर निर्जनस्थळी सामुहीक अत्याचार दिनांक २४ मे २०२५ रोजी करणे, या धक्कादायक घटनेचे व्हिडीओ दिनांक ११ जुलै २०२५ रोजी व्हायरल केल्याची बाब उघडकीस आली असणे, याबाबतची तक्रार पिडीतेने शेगाव (बु.) पोलिस स्टेशन येथे नोंदविणे, याबाबतचे वृत्तांकन दैनिक लोकमत वृतपत्रात दिनांक १२ जुलै २०२५ रोजी प्रकाशित होणे, या घटनेत सहभागी असलेल्या स्वप्नील राजकुमार गुर्जेलवार (वय २३), गणेश राजेंद्र विश्रामकर (वय २४), रा. समुद्रपूर (जि. वर्धा) व रोहन गजानन विश्रामकर (वय २४) रा. चंद्रपूर यांना शेगाव पोलिसांनी अटक केलेली असणे, अल्पवयीन मुलीवर शेतशिवारात नेवून अत्याचार करण्यात येणे व याबाबीचा व्हिडीओ तयार करून व्हायरल करणे अत्यंत गंभीर घटना असणे, या घटनेतील दोषींवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

चिमूर तालुक्यातील अल्पवयीन पीडितेवर लैंगिक अत्याचार करून त्याचा व्हिडीओ काढून व्हायरल करण्याची धमकी दिल्याप्रकरणी पोलीस ठाणे, शेगाव (बु), जि. चंद्रपूर येथे गु. र. क्र. ९६/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७०(२), १२३, १३७(२), ३५१(२) सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम, ४, ६ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० चे कलम ६६(ई), ६७ अन्वये दिनांक ११.०७.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी तीनही आरोपींना अटक करण्यात येऊन दिनांक ०२.०९.२०२५ रोजी आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्यातील आरोपी क्र. ३ यास मा. न्यायालयाने दिनांक १४.०८.२०२५ रोजी जामीन मंजूर केला असून इतर २ आरोपी सद्यस्थितीत न्यायालयीन कोठडीत आहेत.

राज्यात महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

१) राज्यात महिलांवर होणा-या अत्याचाराचा तातडीने निपटारा होण्यासाठी सर्व आयुक्तालय व जिल्ह्यामध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला पोलीस कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

२) जिल्हा/आयुक्तालय तसेच पोलीस स्टेशन पातळीवर महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

३) बलात्कारासारख्या गुन्हयांचा तपास जलद गतीने व्हावा व त्यास आळा बसावा म्हणून पोलीस महासंचालकांद्वारे सर्व घटक प्रमुखांना वेळोवेळी मार्गदर्शक सूचना देऊन संवेदनशीलता निर्माण केली जाते.

४) महिला व मुलींच्या अनैतिक व्यापाराला प्रतिबंध करण्यासाठी राज्यात एकूण ४५ पोलीस घटकांमध्ये "अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष" स्थापन करण्यात आले आहेत.

५) पिडीत महिलांच्या सहाय्यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत पोलीस स्टेशनच्या आवारात महिला समुपदेशन कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

६) डायल ११२ या हेल्पलाईनच्या माध्यमातून महिला व बालकांचा लैंगिक छळ, ॲसिड हल्ला, घरगुती हिंसाचार, विनयभंग, बालविवाह, पोर्नोग्राफी इत्यादि विषयाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तात्काळ मदत पुरविण्यात येते.

७) महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

८) महाराष्ट्र राज्यात प्रि-पेड टॅक्सी सेवा पुरविणा-या उबेर, ओला अशा प्रकारच्या टॅक्सींमध्ये प्रवास करणा-या महिलांच्या सुरक्षिततेसाठी "Panic Button" ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

९) राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीतील शाळा, महाविद्यालयांमध्ये पोलीस काका/पोलीस दिदी पथक भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक अत्याचार, छेडछाड, गुड टच/बॅड टच, सायबर सुरक्षा, अंमली पदार्थ विरोधात जनजागृती निर्माण करतात.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. अभिमन्यु दत्तात्रय पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४६६ पुढीलप्रमाणे आहे.:-

"महावितरण विद्युत सहाय्यक भरती सेवा योजना जा.क्र.०४/२०१९ मधील मराठा समाजातील SEBC ते EWS विकल्पातील पात्र असलेल्या २८२ उमेदवारांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करुन सदरील विद्युत सहाय्यक यांना नियुक्ती देण्यात आली असणे, त्यापैकी अनेक उमेदवार कागदपत्रांची पडताळणी, वैद्यकीय तपासणी व इतर कारणांमुळे अपात्र झाले असणे, सदरील अपात्र उमेदवारांमुळे रिक्त राहीलेल्या पदासाठी सदरील SEBC ते EWS विकल्पातील अधिसंख्य पदांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करुन भरती अंतर्गत अधिसंख्य पदांच्या रिक्त जागी प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत तपासुन कार्यवाही करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदय यांनी प्रधान सचिव, ऊर्जा विभाग मंत्रालय मुंबई यांना दिले असणे, त्यानुसार कक्ष अधिकारी, उद्योग ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दि.८ जानेवारी २०२५ च्या पत्रान्वये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,म.रा.वि वितरण कंपनी मर्या यांना प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करुन भरती प्रक्रिया राबविण्याबाबत कळविले असणे, परंतु अद्यापही कोणतीही कार्यवाही न झाल्याने पात्र उमेदवार भरती प्रक्रियापासुन वंचित असणे, सदरील SEBC ते EWS विकल्पातील अधिसंख्य पदांची रिक्त जागा भरती करण्यासाठी प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करुन भरती प्रक्रीया पुर्ण करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरण जाहिरात क्र. ०४/२०१९, विद्युत सहाय्यक, पदांकरीता सन २०१९ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये एस.ई.बी.सी. व ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गाकरीता राखीव पदांचा समावेश होता. मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचीका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांवरील दि. ०९/०९/२०२० रोजीच्या सुनावणीमध्ये एस.ई.बी.सी आरक्षणास स्थगिती दिली व मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०५/०५/२०२१ च्या निर्णयान्वये सदर आरक्षण अवैध ठरविले होते. सबब, शासन निर्णय दि. २३/१२/२०२०, दि. १०/०२/२०२१ व दि. ३१/०५/२०२१ एस.ई.बी.सी. प्रवर्गातून अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना खुला अथवा ई.डब्ल्यू.एस. यापैकी कोणत्या आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे याकरीता विकल्प स्विकारण्यासाटी Linkकंपनीच्या संकेतस्थळावर अनुक्रमे माहे फेब्रु-२०२१ व जुन-२०२१ मध्ये उपलब्ध करून दिली होती. सदर पदाचा निकाल माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता.

या दरम्यान दि. २३/१२/२०२० रोजीच्या शासन निर्णयाविरूद्ध मा. उच्च न्यायालय मुंबई येथे काही उमेदवारांनी याचिका क्र. ५१९६/२०२१ दाखल केली होती. सदर याचिकाबाबत मा. न्यायालयाने दि. २९/०७/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर शासन निर्णय हे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही असा निर्णय दिलेला होता. या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र २२२३८-२१२४५/२०२२ दाखल केली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर अपील दि. २४/०१/२०२३ रोजी खारीज केली. त्यानुसार, सदर पदाचा निकाल सुधारीत करण्यात आला. तद्नंतर एस.ई.बी.सी ते ई.डब्ल्यू.एस विकल्प

स्विकारलेले काही उमेदवार निवड यादीतून बाहेर पडले होते. याबाबत, सदर उमेदवारांकडून शासनास प्राप्त निवेदनानुसार शासनाकडून पत्र दि. ०१/०३/२०२४ अन्वये एक विशेष बाब म्हणून सदर उमेदवारांची अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत महावितरण कंपनीस निर्देश देण्यात आले. त्यानूसार, एकूण २८२ उमेदवारांची अधिसंख्य पदे निर्माण करून पात्र उमेदवारांना नियुक्त्या महावितरण मार्फत देण्यात आलेल्या आहेत. सदर जाहिरातीची भरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे व उमेदवारांची कोणतीही प्रतिक्षा यादी उपलब्ध नाही.

तसेच सदर निर्माण केलेल्या अधिसंख्य पदाविरुध्द मा. औरंगाबाद न्यायालयामध्ये काही उमेदवारांनी याचिका क्र. २९९९/२०२४ व सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ३२२८/२०२४ दाखल केले असून सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहे.

सद्यस्थितीत जाहिरात क्र. ०४/२०१९ पुर्ण झालेली असून सदर पदाकरीता नव्याने जाहिरात क्र. ०६/२०२३ प्रसिद्ध करण्यात आली असून भरती प्रक्रिया सुरू आहे

.....

लक्षवेधी सूचना क्र. २१९७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय पावसाळी अधिवेशन.

श्री. मुरजी (काका) पटेल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१९७ पुढीलप्रमाणे आहे:-

"पर्यावरणाची हानी टाळून अर्थिक विकास अबाधित राहण्यासाठी सौर ऊर्जा भविष्यासाठी नवीनीकरणीय असून शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी मा.पंतप्रधान यांनी पीएम सुर्यघर मोफत वीज योजना रूप टॉप सौर ऊर्जा सोलार योजना अंमलात आणणे, राज्यात मा. मुख्यमंत्री यांनीही सौर ऊर्जाच्या विविध योजना अंमलात आणल्या असणे, राज्यातील ग्रामीण भागातील जनता उपजिवीके साधनासाठी शहराकडे वळत असणे, शहरी/नागरी भागाचे प्रतिनिधीत्व करणा-या लोकप्रतिनिधींना, ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी/नागरी भागात सौर ऊर्जेबाबत त्यांच्या आमदार स्थानिक विकास निधी वापरण्यात मर्यादा असणे, नागरी भागातील गृहनिर्माण संस्थांच्या जागेवर सौर ऊर्जाची कामे करण्यासंदर्भात दि.२२ जून,२०२२ ते दि.४ मार्च,२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये काही जाचक अटी असल्यामुळे गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर सौर ऊर्जा संच बसविणे खूप कठीण झालेले असणे, वाढती लोकसंख्या व वाढती विजेची मागणी लक्षात घेऊन नागरी भागातील रहिवाशांना सौर उर्जेचा लाभ मिळावा यासाठी उक्त शासन निर्णयातील अटी शिथील करण्याची आवश्यकता, किंबहूना नागरी भागात सौर उर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी नवीन योजना निर्माण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मुख्यमंत्री (नियोजन) यांचे निवेदन

मा. विधानमंडळ सदस्यांना त्यांच्या क्षेत्रात, स्थानिक गरजा व पायाभूत सुविधा यांची आवश्यकता विचारात घेऊन, लोकोपयोगी कामे सुचविता येणे, तसेच या कार्यक्रमांतर्गत शासनाची स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे, हा उद्देश समोर ठेवून आमदार स्थानिक विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नियोजन विभाग, शासन निर्णय दि.१२ जुलै, २०१६ अन्वये मा.मंत्रीमंडळ उप समितीच्या दि.२८ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत आमदार स्थानिक विकास कार्यक्रम करिताच्या अंतिम करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. मा.मंत्रीमंडळ उप समितीच्या मान्यतेनुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील व या क्षेत्राला लागून असलेल्या ग्रामीण परिसरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जागेवर पायाभूत सुविधांची कामे नियोजन विभाग, शासन निर्णय दि.२२ जून, २०२२ अन्वये अनुज्ञेय करण्यात आली आहेत. सदरहू शासन निर्णयात सहकारी गृहनिर्माण संस्थांकरिता निकष विहित करण्यात आलेले आहेत. त्या निकषांमध्ये मागील ३ वर्षांचे वैधानिक लेखापरीक्षण झालेले असावे व सदर संस्थेस किमान ब+ वर्ग दर्जा प्राप्त असावा हा एक निकष होता. सहकार विभागाच्या सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणा संदर्भातील वर्गीकरणाबाबतच्या तरतूदीमध्ये ब+ असे वर्गीकरण नाही. त्यामुळे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अभिप्रायानुसार नियोजन विभाग शासन शुद्धिपत्रक दि.४ मार्च २०२५ अन्वये खाजगी गृहनिर्माण संस्थेस लेखापरिक्षणाचा किमान ब व त्यावरील दर्जा असावा हा व अन्य निकष विहित करण्यात आले आहेत.

३. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने केंद्र शासनामार्फत 'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना' दि.१३ फेब्रुवारी, २०२४ पासून राबविण्यात येत असल्याचे कळविले आहे. सदर योजना प्रामुख्याने दरमहा ३०० युनिट पर्यंत वीज वापर असलेल्या सामान्य ग्राहकांसाठी रु.७८,०००/- अनुदान देण्याबाबत आहे. ३ किलोवॅट पर्यंत किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेची सौर उर्जा प्रणाली स्थापित केल्यास अधिकतम रु.७८,०००/- अनुदान देण्यात येते त्याव्यतिरिक्त निवासी गृहसंकुलाच्या सामायिक वापराकरिता सौर उर्जा प्रणाली उभारल्यास प्रति किलोवॅट करिता रु.१८,०००/- अनुदान देण्यात येते.

४. 'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजने'च्या धर्तीवर उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.६ ऑक्टोबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप सोलार (SMART)' योजने अंतर्गत राज्यातील दारिद्य रेषेखालील आणि दरमहा १०० युनिटपर्यंत वीज वापर असणाऱ्या ग्राहकांच्या घरांच्या छतावर सौर यंत्रणा उभारण्याकरिता राज्य शासनातर्फे दारिद्रय रेषेखालील ग्राहकांना रु.१७,५००/-,अुनसूचित जाती/जमाती करिता रु.१५,०००/- आणि सर्वसाधारण वर्ग करिता रु.१०,०००/- याप्रमाणे अतिरिक्त अनुदान देण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत सन २०२६-२७ पर्यंत ५ लाख घरांवर सौर उर्जा यंत्रणा उभारण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असून त्याकरिता रू.६५५.००कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीकरिता महावितरण कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. योजनेची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप सोलार (SMART)' योजनेची अंमलबजावणी राज्यात महावितरण आणि संबंधित यंत्रणेकडून करण्यात येते.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. विजय शिवतारे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३१९ पुढीलप्रमाणे आहे.:-

"पुणे जिल्ह्यातील मौजे देवडी, चिव्हेवाडी, केतकावळे आणि कुंभोशी या पुरंदर तालुक्यातील गावांमध्ये रॉयल पुरंदर, बालाजी धाम या प्रकल्पात रहिवास प्रयोजनार्थ (निवासी) अकृषिक वापरास परवानगी न घेता वनघराच्या नावाने अकृषिक वापरास मंजुरी घेणे, ग्राहकांना रहिवासी प्रयोजनासाठी भुखंड विक्री करणे, मंजूर व देय बांधकाम क्षेत्रापेक्षा अधिक भूखंड आणि क्षेत्रफळाची विक्री करणे, ग्राहकांची करोडो रुपयांची फसवणूक होणे, दोनही प्रकल्पात बेसुमार उत्खनन करणे, शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडवणे, तत्कालीन मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांचे कारवाईचे आदेश, पीएमआरडीए आणि महसूल विभागाचे दुर्लक्ष, ग्राहकांच्या मध्ये फसवणुकीमुळे असंतोष आणि संतापाची भावना निर्माण होणे, ग्राहकांच्या हक्कांना शासनाकडून संरक्षण देण्याची गरज, हलगर्जीपणा आणि शासन आदेशांची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर करावयाची कारवाई, शासनाची या संदर्भात भूमिका, करावयाची वा केलेली उपाययोजना."

उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मौ. देवडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील ग.नं. 605 (पै.) मधील 47.88 हेक्टर क्षेत्रावर दि.17/05/2012 रोजी वनघर रेखांकनाकरीता उपविभागीय अधिकारी, भोर यांचेमार्फत परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि, जागेवरील प्रत्यक्ष झालेल्या विकासामध्ये बदल असल्याने सदर प्रकरणी भाऊसाहेब नारायण भोसले यांना अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे मार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 53 (1) अंतर्गत नोटीस दि. 05/09/2023 रोजी बजावण्यात आलेली आहे. सदर नोटीस विरोधी बांधकामधारक यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन क्र. 12360/2023 दावा दाखल केला आहे. सदरचा दावा प्रलंबित आहे.उक्त प्रकरणी श्री. भाऊसाहेब भोसले, यांनी जागेवरील बदलानुषंगाने सुधारित परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव प्राधिकरणाकडे दि.20/02/2024 रोजी मान्यतेसाठी दाखल केला आहे. सदर प्रस्तावास मा. महानगर आयुक्त यांची तत्वत: मान्यता प्राप्त असुन, चलन निर्गत केले आहेत. तथापि, विकासक यांनी अदयाप चलन भरणा केलेला नाही. सबब, सुधारित विकास परवानगी प्रमाणपत्र अद्याप निर्गत करण्यात आलेले नाही.

मौ. मिसाळवाडी, ता. पुरंदर, येथील गट नं. 1 पै. येथील दि. 30/11/2022 रोजी स्थळपाहणी होऊन अंदाजे 48 एकर क्षेत्रावर श्री. दत्तात्रय यशवंत शिळीमकर (बालाजी धाम, गारवा ग्रुप) यांनी अनधिकृत विकसन केलेचे निदर्शनास येऊन संबंधितांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 53 (1) अंतर्गत नोटीस बजावल्याचे दिसुन येत आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये संबंधित श्री. शिळीमकर यांनी विकास परवानगी विभागाकडे परवानगी करीता अर्ज दाखल केला असता सदर प्रकरणी त्रुटी कळविण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० (१बी) अन्वये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील मौ. मिसाळवाडी व मौ. कुंभोशी ता. पुरंदर, जि. पुणे व इतर ११५ महसूली गावांचा समावेश असलेल्या क्षेत्राकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून दि.१०.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने उक्त क्षेत्राकरीत विकास योजना तयार करावयाचे काम प्रगतीपथावर असून सद्यस्थितीत अस्तित्वातील जमीन वापर नकाशा (Existing Land Use Map) तयार करावयाचे काम सुरू आहे.

'बालाजी धाम' हा प्रकल्प मिसाळवाडी या गावात समाविष्ट असून त्यास वनघरानुषंगाने परवानगी देण्यात आलेली नाही. मौजे मिसाळवाडी मधील उक्त प्रकल्प हा एकात्मिक नगर वसाहत स्वरूपाचा प्रकल्प (ITP) असून त्यास शासनाने LOCATION CLEARANCE (LC) व जिल्हाधिकारी पुणे यांनी LETTER OF INTENT (LOI) दिलेले आहे. त्यानुषंगाने प्रकल्प प्रवर्तक यांनी संबंधीत एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाचा (ITP) बृहत आराखडा (MASTER PLAN) मंजुरीकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या क्षेत्राकरीता नियोजन प्राधिकरण असल्याने त्यांच्याकडे प्रकरण दाखल केलेले असून याबाबतची कार्यवाही महामंडळ स्तरावर सुरू आहे.

.....

लक्षवेधी सूचना क्र.२३५५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. उमेश ठाकरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"नगरविकास विभाग हे विशेष नगर वसाहती अधिसुचना विकासकांसाठी काढताना १०० एकरवरील जमिनीचे शासनाकडून असलेले ॲटर्नी जनरल यांच्याकडुन कायदेशीर सर्च टायटल रिपोर्ट न घेतल्यामुळे जमिनीच्या टायटलचा प्रश्न उद्भवून महारेरा व सदनिकाधारकांची फसवणूक होत असणे, मौजे-माजिवाडा तालुका जिल्हा ठाणे येथील सर्वे क्र.३८६ पैकी, ४२/१/अ व इतर सर्व्हे नंबर मध्ये अनियमितता व अगुणवत्ता झाल्याचे दिसुन आलेले असणे, सदरच्या जमिन मिळकत ही संरक्षीत कुळ खातेदारांना कायमस्वरुपी सरकारने खरेदी नोंदणीने दिलेली माजिवाडा टेनेन्ट फर्मिंग सोसायटीला डावलून तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांच्या गैरव्यवहारातुन पंजाबच्या बिगर शेतकऱ्याला गहाण खतावरुन भोगवटदार मालक बनवले असणे, एकावरच न थांबता खाजण कांदळवन सरकारी ठाणे शहरातील नाल्याची जमीन कवडी मोलाच्या भावाने विकासकाला देण्यात आली असणे, यामध्ये जिल्हाधिकारी व महाराष्ट्र शासनाने नेमुन दिलेल्या ९० टक्के अटी व शर्तीचा भंग झालेला असुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व गैरकारभार झालेला असणे, अटी शर्तीचे पालन होत नसल्याचे तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी हे दक्षता घेत नसल्यामुळे ३०० कोटीचा गौणखनिज व २५० कोटीचे गहाण खताचे दस्त मुद्रांक बुडवण्यात आलेले असणे,विशेष नगर वसाहतीच्या मंजुर नकाशा प्रमाणे काम होत नसल्याने महानगरपालिका व भूमि अभिलेख हे यामध्ये सामिल असल्याचे तक्रारदार रोहिदास पाटील यांनी दिनांक ३०/०६/२०२५, ७/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महसुल मंत्री, कोकण आयुक्त, संचालक नगररचना, जिल्हाधिकारी, आयुक्त महानगरपालिका, नोंदणी महानिरीक्षक, जमाबंदी आयुक्त, पोलिस महासंचालक व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग या सर्वांना दोन प्रकारे तक्रार दिलेली असुनही कारवाई होत नसल्याने शासनाने दखल घेऊन खाजण जमिन सरकारी नाला व शेतकऱ्यांच्या जमिनी परत घेणेबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

शासन, नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक २४ऑगस्ट, २००९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार विशेष वसाहत म्हणून मुमंस/टीपीएस-१२०७/२२०/प्र.क्र.५४१/०८/नवि-१२, दिनांक २४/०८/२००९ अन्वये मौजे माजिवडा ता.जि.ठाणे येथील एकूण २१२ स.नं. मधील क्षेत्र ५२-७०-१९ हे.आर पैकी ४८-२०-०२ हे.आर क्षेत्र हे विशेष नगर वसाहत प्रकल्पासाठी शासनाने दिलेली आहे.

शासनाच्या महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्रमांक न्यायप्र-२०१२/प्र.क्र.२८४/ज-४, दि. २३/०३/२०१८ नुसार मौजे माजिवडे, ता.जि. ठाणे येथील स.नं. ३८६/२अ, क्षेत्र ०.०१.८१ हे.आर, स.नं. ३८६/३अ, क्षेत्र ०.४६.४० हे.आर, स.नं. ३८६/५अ, क्षेत्र ३.५१.६४ हे.आर असे एकूण ३.९९.८५ हे.आर ही शासकीय जमीन रू ११५,५५,६६,५००/- इतकी कब्जेहक्काची रक्कम आकारुन मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये करण्यात आलेल्या समझोता करारानुसार विशेष नगर वसाहत प्रकल्पासाठी मे. कॅपस्टोन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना प्रदान करण्यात आली आहे.

मौजे-माजिवडे, ता.जि.ठाणे येथील फेरफार क्र.३७९, दिनांक ०३/०१/१९३७ अन्वये स.नं.१२, व इतर स.नं. चे क्षेत्र ४६-४७-७१ हे.आर. एवढे असून ते पूर्वी श्री. जगन्नाथ बाळाजी सातघरे यांच्या नावाची नोंद होती. सदरची व्यक्ती दि १९/०४/१९३६ रोजी मयत झाल्याने त्यांचे वारस श्रीम.गोपीकाबाई जगन्नाथ सातघरे व इतर यांची नावे वारस म्हणून दाखल झालेली होती.

तद्नंतर सदरचे ४६-४७-७१ हे.आर. हे क्षेत्र श्री. जगन्नाथ सातघरे व इतर यांनी श्री. महम्मद अली ताजाभाई यांना विक्री केले. उक्त क्षेत्राचे हस्तांतरण श्री. महम्मद अली ताजाभाई यांच्याकडून श्री. हरकलाल यांच्याकडे व श्री. हरकलाल यांच्याकडून गहाण खतानुसार श्री. आर.एस.वर्मा यांच्याकडे हस्तांतरीत झाल्याचे दिसून येत आहे.

तद्नंतर मौजे माजिवडे, ता.जि.ठाणे येथील फेरफार क्र. ९८३, दिनांक २९/०१/१९५८ अन्वये स.नं.१२ व इतर ३२ या स.नं. चे ४६-४७-७१ हे.आर. क्षेत्र खालसा करून तालुका माजिवडा टेनन्ट फार्मिंग सोसायटी यांना १० वर्षाच्या लागवडीस दिलेले होते व कब्जेदार सदरी सरकार नाव दाखल करुन इतर हक्कात श्री.आर.एस.वर्मा यांचे नाव दाखल करण्यात आले तसेच माजिवडे टेनन्ट फार्मिंग कंपनीचे नाव कूळ म्हणून इतर हक्कात दाखल केले. तद्नंतर फेरफार क्र.१२४०, दिनांक २५/१०/१९६३ अन्वये सरकार नाव कमी करुन श्री.आर.एस.वर्मा यांचे नाव दाखल केले व फेरफार क्र.१३९९, दिनांक ०५/१२/१९६६ अन्वये माजिवडा ग्रामविकास को.ऑप.फार्मिंग सोसायटीचे कूळ म्हणून असलेली नोंद कमी करून श्री.आर.एस.वर्मा यांचे नावाची नोंद जमिनीच्या कब्जेदार सदरी केली.

तदनंतर मौजे माजिवडे, ता.जि.ठाणे येथील फेरफार क्र.२४८८, दिनांक ०५/०८/२००६ अन्वये स.नं.१२ व इतर ३२ या स.नं. चे क्षेत्र ४१-९१-३३ हे.आर.प्र. या जमिनीचे मालक अशोक उदयसिंग वर्मा व इतर यांचेकडून कॅपस्टोन प्रॉपर्टिज प्रा. लि. मेघ मल्हार कॉम्पलेक्स, गोरेगाव, मुंबई व इतर यांनी केलेल्य विकास करारान्वये विकासक म्हणून मे.कॅपस्टोन कंस्ट्रक्शन प्रा. लि. चे संचालक बोमन रुस्तम इराणी असे ७/१२ चे इतर हक्कात नावाची नोंद घेतल्याचे दिसून येत आहे.

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ नुसार कांदळवनाचा ऱ्हास करणे, कांदळवन जमिनीवर अनधिकृत डेब्रीज भरणी करुन अनधिकृत बांधकाम करणे, सी. आर. झेड चे उल्लंघन इत्यादी बाबी निर्दशनास आल्याने तहसीलदार ठाणे यांनी त्यांच्या दिनांक १३/११/२०२५ रोजीचे पत्रान्वये मे. कॅपस्टोन कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना प्रति सर्व्हे नंबरसाठी र. रु. ५,००,०००/- याप्रमाणे मौजे माजिवडे, ता. जि. ठाणे येथील स.नं. १२/१ व इतर असे एकूण २३ सर्व्हे नंबरकरीता एकूण र. रु. १,१५,००,०००/- इतकी दंडाची रक्कम शासन जमा करणेबाबत नोटिस देण्यात आलेली असून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

मौजे माजिवडे, ता. जि. ठाणे येथील स.नं. १२, ४९, ५०, ५१, ३८६, ३४५, ४२३/सी, ४२३/डी, ४२३/व्ही या कांदळवन बफर झोन क्षेत्रामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या विनापरवानगीने झालेल्या / सुरू असलेल्या बांधकामाबाबत चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली असून सदर समितीमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

ठाणे तालुक्यामध्ये सन २००९ ते सन २०२४ या कालावधीमध्ये १,२१,४००/- ब्रास इतके गौणखनिज उत्खननाबाबतची परवानगी देण्यात आलेली आहे. सदरचे परवानगीची शासनास देय असलेली र. रु.७,०५,६९,७९८/ इतकी रक्कम चलनाद्वारे शासन जमा करुन घेण्यात आलेली असून कोणत्याही प्रकारे गौणखनिजाची वसुलीबाबत नुकसान झाले नसल्याचे दिसून येत आहे. तसेच मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या पत्र दिनांक १३/०१/२०२६ पत्रान्वये गहाणखत संलेख हा नोंदणीकृत असलेबाबत कोणतीही बाब नमूद (दस्त क्रमांक व वर्ष इ.) नसल्यामुळे गहाणखताचे मुद्रांक शुल्क बुडविले किंवा कसे याबाबत भाष्य करता येत नाही असे नमूद केले आहे.

श्री. रोहीदास पाटील व इतर यांच्या दिनांक ३०.०६.२०२५ व २९.०७.२०२५ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत उप विभागीय अधिकारी, ठाणे व उप आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना कळविण्यात आले असून सदरचा अहवाल प्राप्त होताच नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

****

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ दुसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक १५०४

श्री. अभिजित पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १५०४ पुढीलप्रमाणे आहे.

""सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय, जलपर्यटन, धार्मिक, निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटन, विनयार्ड पर्यटन विकासाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याच्या" प्रस्तावास मा.पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हास्तरीय समिती" ने रु.३४२.७५ कोटी खर्चाचा प्रस्ताव मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर केलेला असणे, उक्त प्रस्तावावर उच्चाधिकार समितीच्या दि.२१.०८.२०२४ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्तावातील पाण्याखालील प्राचीन शहर रु.५० कोटी तसेच मार्केटींग, ब्रेडींग व क्षमता बांधणी रु.१० कोटी असे एकूण रु.६० कोटी किंमतीचे काम वगळून उर्वरित रु.२८२.७५ कोटी इतक्या किंमतीचा आराखडा मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील शिखर समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्याची शिफारस करण्यात येणे, तदनंतर दि.३०.०९.२०२४ रोजी सदर प्रस्तावित रु.२८२.७५ कोटी किंमतीच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, कामांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना "संनियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येणे, उक्त आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळून ८-९ महिने उलटूनही अद्याप प्रत्यक्ष कामास सुरूवात झालेली नसणे, शासनाने उक्त प्रकरणी व तातडीने पारदर्शक चौकशी करुन निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.""

मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे निवेदन

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी "सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय, जलपर्यटन, धार्मिक, निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटन, विनयार्ड पर्यटन विकासाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याच्या" रूपये ३४२.७५ कोटीच्या प्रस्तावास जिल्हास्तरीय समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून शासनास सादर करण्यात आला. दि.२१.०८.२०२४ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत सदर प्रस्तावातील पाण्याखालील प्राचीन शहर रुपये ५०.०० कोटी तसेच मार्केटींग, ब्रँडींग व क्षमता बांधणी रुपये १०.०० कोटी असे एकूण रुपये ६०.०० कोटी किंमतीचे काम वगळून उर्वरित रुपये २८२.७५ कोटी इतक्या किंमतीचा आराखडा मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील शिखर समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्याची शिफारस उच्चाधिकार समितीने केली. त्यास अनुसरून मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने सदर आराखड्याच्या प्रस्तावित

रूपये २८२.७५ कोटी इतक्या रकमेच्या आराखड्यास मंजुरी दिली. त्यानुसार दि.३०.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये रुपये २८२.७५ कोटी इतक्या रकमेच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी सामायिक लेखाशीर्षातर्गत रुपये ३००.०० कोटी तरतूदीपैकी रुपये ५०.०० कोटी व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सामायिक लेखाशीर्षातर्गत रुपये ५४१.१८३३ कोटी तरतूदीपैकी रुपये १००.०० कोटी इतकी तरतूद सदर आराखड्यासाठी करण्यात आली आहे.

सदर आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर आतापर्यंत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

❖ <u>उजनी जल पर्यटन अंतर्गत कामे</u> :-

१. उजनी जलाशयाचे तसेच उजनी प्रकल्पांतर्गत संपादित केलेल्या उजनी (टे), शिराळ (टे) व सुर्ली या गावांतील जमिनीचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे.

२. उजनी धरण जलपर्यटनाकरिता आवश्यक बोटी व अनुषंगीक साहित्य खरेदी करण्याकरिताचे काम तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा स्तरावर आहे.

३. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या मध्ये सामंजस्य करार करण्याकरिता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना प्रस्ताव पाठवला आहे.

❖ <u>कृषी पर्यटन केंद्र व कृषी मॉल अंतर्गत विकसित करावयाची कामे</u> :-

१. कृषी पर्यटन केंद्रात विविध स्टॉल्स उभारण्याच्या दृष्टीने परिसरातील शेतकरी, उत्पादक कंपनी/महिला बचत गट/उत्पादक गट यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. याकरिता ५९ इच्छुकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यानुसार कृषी पर्यटन केंद्र संकल्पना व 3D मॉडेल तयार केले असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

२. एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यांतर्गत प्रमुख धार्मिक स्थळांना जोडणाऱ्या राष्ट्रीय/राज्य मार्गावर टोल प्लाझा जवळ/वर्दळीच्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या १० कृषी मॉलसाठी १० महामार्गाचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून ३ ठिकाणच्या जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून उर्वरीत ७ ठिकाणी जागा निश्चित करण्याची कार्यवाही चालू आहे.

❖ <u>विनयार्ड पर्यटन अंतर्गत कामे</u> :-

विनयार्ड प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या खुडूस येथील जागेची मागणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे केली आहे. सदर जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

❖ <u>धार्मिक पर्यटन अंतर्गत कामे</u> :-

१. पाच मंदिराच्या ठिकाणी पुरवावयाच्या पायाभूत सुविधांतर्गत श्री. सिद्धेश्वर मंदीर, सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर महाराज तलाव येथे Aerator System बसविण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. पाच मंदिरांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कामांच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही सुरू असून तद्नंतर प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

एकंदरित "सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय, जलपर्यटन, धार्मिक, निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटन, विनयार्ड पर्यटन विकासाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यातील" कामे तांत्रिक मान्यता तसेच निविदा स्तरावर सुरू असून प्रत्यक्ष कामांना लवकरच सुरूवात करण्यात येईल.

****

लक्षवेधी सूचना क्र.२०१७

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. अर्जुन खोतकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०१७ पुढीलप्रमाणे आहे:-

"जालना जिल्ह्यात समृद्धी महामार्गाचे काम मोठ्या प्रमाणात सुरु असून या प्रकल्पासाठी हजारो शेतकऱ्यांची उपजीविकेची साधने असलेली शेती सरकारने संपादित करण्याची अधिसूचना काढली असणे, सदर अधिसूचनेस ३ वर्षे उलटूनही भूसंपादन प्रक्रिया अंतिम न होणे, जिल्हाधिकारी यांच्याकडुन कार्यवाहीत विलंब होत असून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना वेठीस धरत असणे, अद्याप जमिनी मोजणीच्या पलीकडे प्रक्रिया पुढे न सरकणे, त्यातच एकरी दीड कोटींचे बाज़ारमूल्य असतानां २०-२५ लाखांची मूल्यांकने काढून बाधित शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा प्रयत्न करणे, खरंतर ज्यावेळे जमीन खरेदी करायची त्यावेळचे भाव लागू होणे अपेक्षित असणे, परंतू शासनाने या जमिनींना पूर्वीचेच भाव लागू केले असणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रति निर्माण झालेली चीड व असंतोषाची भावना, या गंभीर प्रश्नाकडे शासनकर्त्यांनी लक्ष देऊन प्रत्यक्ष पाहणी करून शासकीय दर आणि सर्वाधिक बाजार मूल्य याचा तुलनात्मक अभ्यास करून जो जास्त दर निघेल त्याचा संदर्भ घेऊन मूल्यांकन ठरवण्याची आवश्यकता, याबाबत बाधित शेतकऱ्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, महाराष्ट्र समृध्दी महामार्गास जोडणाऱ्या जालना-नांदेड महामार्गाचे भूसंपादन करणेसाठी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते व विकास महामंडळ मर्या. जालना यांचेकडून महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ नुसार जालना तालुक्यातील ३५२ हेक्टर क्षेत्र व परतूर व मंठा तालुक्यातील २७८ हेक्टर असे एकूण ६३० हेक्टर अनिवार्य भूसंपादनाचा प्रस्ताव सन २०२१ मध्ये सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार भूसंपादनासाठीची प्राथमिक अधिसुचना दिनांक २१ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. प्रकल्पातील संपादित जमिनीची मोजणीची प्रक्रिया सन २०२२ मध्ये पुर्ण करण्यात आलेली आहे.

जालना-नांदेड महामार्गासाठी जालना तालुक्यातील ७५% व परतूर व मंठा तालुक्याचे ९६% निवाडे घोषित करण्यात आलेले आहेत. उर्वरित क्षेत्रांचे निवाडे घोषित करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे भुसंपादनाची प्रक्रिया अंतीम टप्प्यात आलेली आहे.

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, महाराष्ट्र समृध्दी महामार्गास जोडणाऱ्या जालना-नांदेड महामार्गासाठी संपादित जमिनीचा मोबदला निश्चिती करण्यासाठी भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम २६ ते ३० अन्वये करण्यात येत आहे. सदर तरतुदीनुसार बाजारमुल्य व शिघ्रसिद्ध गणकदर यांची तुलना करुन उच्चतम दर विचारात घेऊन भूसंपादीत जमिनीचा मोबदला निश्चित करण्यात आला आहे. तसेच

भूधारक यांचे संपादित जमिनीचा निवाडा घोषित करताना अधिसुचना दिनांक २१ नोव्हेंबर २०२१ पासून निवाडा घोषित करण्याच्या दिनांकापर्यत नविन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ३० नुसार अतिरिक्त स्वरुपात १२% प्रती वर्षाप्रमाणे व्याजाची रक्कम भूधारकास अदा करण्यात येत आहे.

भूसंपादन मोबदल्याच्या अनुषंगाने भूधारकांना आक्षेप असल्यास वाढीव मोबदल्याकरीता भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम-६४ नुसार भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण यांच्याकडे अपिल दाखल करण्याची तरतुद आहे. भूसंपादन अधिनियम व शासन निर्णयातील तरतुदीनुसार भूसंपादनाची कार्यवाही करुन शेतकऱ्यांचे कुठलेही आर्थिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

****

लक्षवेधी सूचना क्र. १०४२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १०४२

श्री.राजेश बकाने, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १०४२ पुढील प्रमाणे आहे :-

"संपूर्ण विदर्भात प्रसिद्ध असलेले कस्तुरबा हेल्थ सोसायटी द्वारा संचालित सेवाग्राम रुग्णालय हे केंद्र शासनाचे ५०% अनुदान व राज्य सरकारचे २५% अनुदानाच्या सहकार्याने चालवली जात असून त्या ठिकाणी संपूर्ण विदर्भातून रुग्ण औषध उपचारासाठी येत असणे, परंतु रुग्णालय प्रशासनाचा हेकेखोर वृत्तीमुळे रुग्णांची हेळसांड होत असल्याचे निदर्शनास आले असणे, येथे शासकीय योजनांची अंमलबजावणी होत नसणे, व्यवस्थापन सुद्धा कर्मचाऱ्यांना अतिशय हीन वागणूक देते व त्यांच्या हक्काचे वेतन सुद्धा योग्य प्रमाणात दिले जात नसणे, या मनःस्तापामुळे कर्मचा-यांची मानसिक अवस्था बिकट झाली असणे, या ठिकाणी ७५ टक्के अनुदान मिळून सुद्धा तेथील वैद्यकीय उपकरणांची उणीव तसेच तज्ञ डॉक्टरांची कमतरता असणे, त्यामुळे रुग्णांना कोणत्याही सोयी उपलब्ध होत नसणे, केंद्र आणि राज्य सरकार मिळून ७५ टक्के अनुदान मिळत असल्यामुळे सदर संस्थेद्वारा रुग्णांना योग्य औषधोपचार मिळण्यासाठी शासन स्तरावरून कार्यवाही होणे करिता तसेच जिल्ह्याचे पालक सचिव यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्याची आवश्यकता, या संस्थेचे लेखा परिक्षण करण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

कस्तुरबा हेल्थ सोसायटी, सेवाग्राम, वर्धा या संस्थेची स्थापना सोसायटी नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत दि.११.०९.१९६४ रोजी करण्यात आली. आवश्यक उपाययोजनांचा अवलंब करुन रोगांचे निर्मूलन करणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. कस्तुरबा हेल्थ सोसायटीचा सर्व निधी तसेच मालमत्ता व संसाधनांचा वापर मुख्यत: महात्मा गांधी इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्रामसाठी केला जातो. अवर सचिव, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग मंत्रालय,नवी दिल्ली यांच्या दि.२२.२.१९७५ च्या पत्रान्वये कस्तुरबा हेल्थ सोसायटीच्या अंतर्गत महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलची रचना व कार्ये निश्चित केली आहे. संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिल वर राज्य शासनामार्फत सचिव, वैद्यकीय शिक्षण व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन हे दोन प्रतिनिधी आहेत. संस्थेच्या बैठका नवी दिल्ली येथे होतात. बैठकीत मंजूर केलेल्या तरतूदीनुसार

दरवर्षी अंदाजपत्रकात तरतूद केली जाते. सदर संस्थेसाठी केंद्र शासन, राज्य शासन व संस्थेमार्फत अनुक्रमे ५०:२५:२५ या प्रमाणात वार्षिक निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सन १९६९ मध्ये महात्मा गांधी इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस सुरु करण्यात आले आणि कस्तुरबा रुग्णालयाशी संलग्न करण्यात आले. हे भारतातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आहे.

सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दररोज साधारणपणे १५०० ते २५०० बाह्य रुग्ण येत असतात. रुग्णालय मागील ५५ वर्षांपासून गोरगरीब नागरिकांसाठी माफक दरात दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्याचे काम करीत आहे. रुग्णालयाचे प्रशासनामुळे रुग्णांची हेळसांड होत असल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार कस्तुरबा रुग्णालयाचे व्यवस्थापनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. कस्तुरबा रुग्णालयात शासनामार्फत जाहीर करण्यात आलेल्या आरोग्य विषयक योजनांची नियमित रित्या अंमलबजावणी करण्यात येत असून अनेक रुग्णांना त्याचा फायदा होत आहे. कस्तुरबा रुग्णालयाच्या व्यवस्थापनाद्वारे अधिकारी व कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारची हीन वागणूक मिळत असल्याबाबतची तक्रार व्यवस्थापनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. कस्तुरबा रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती पत्रात नमूद केलेले वेतन नियमाप्रमाणे अधिकोषाद्वारे संबंधित कर्मचाऱ्यांचे खात्यात प्रत्येक महिन्याला थेट जमा केले जाते. महात्मा गांधी मेडिकल कॉलेजशी संलग्नित कस्तुरबा रुग्णालय हे शैक्षणिक रुग्णालय असून येथे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषानुसार आवश्यक सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. पदवी तसेच पदव्युत्तर शिक्षणासाठी अध्यापक वर्गातील १२२ पैकी ३ पदे सोडून सर्व पदे भरलेली आहेत. रुग्णांना डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच संस्थेचे प्रत्येक वर्षाचे ऑडिट हे महालेखापाल कार्यालयाद्वारे (CAG) करण्यात येते. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता संस्थेमार्फत शैक्षणिक कार्य तसेच रुग्णसेवा योग्य प्रकारे पार पाडले जात असल्याचे स्पष्ट होते. यास्तव, सदर संस्थेवर प्रशासक नेमण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

****

महाराष्ट्र विधानसभा
2025 चे (दुसरे) पावसाळी अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्रं.1386
श्री.रणधीर सावरकर, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम 105 अन्वये
उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.1386.

"श्री.संत गाडगे बाबा विद्यापीठ अमरावती यांचे अकोला येथे अकोला, वाशिम व बुलढाण जिल्ह्याकरीता विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्याची दीर्घ कालीन मागणी असणे, अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणावर असणे, तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयीन कामाकरीता अमरावती येथे जाण्याकरीता किमान 100 कि.मी. तर कमाल 250 कि.मी. अंतर असल्याने प्रवासामधील मोठ्या प्रमाणात वेळ खर्च होणे, महाविद्यालयीन प्रशासन, विद्यार्थी व पालक यांना अमरावती येथे जाणे वेळखाऊ आणि आर्थिक खर्चिक असल्याकारणाने अकोला येथे उपकेंद्र सुरु करण्यासाठी दीर्घकालीन मागणी असणे, सदरचे उपकेंद्र अकोला येथे सुरु करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरु यांना मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देशित केलेले असणे, सदर उपकेंद्र अकोला येथे सुरु करण्यासाठी दिर्घकालीन प्रतिक्षेत असल्याने सदरील उपकेंद्र शिघ्रतम सुरु करण्यासाठी शासनाची भुमिका व करावयाची कार्यवाही".

श्री. चंद्रकांत पाटील, मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे निवेदन

राज्यातील विविध अकृषि विद्यापीठांकडून तसेच मा.लोकप्रतिनिधींकडून उपपरिसर/उपकेंद्र सुरु करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त होत आहेत. यामध्ये गोंडवाना विद्यापीठाचे चंद्रपूर येथे उपकेंद्र, मुंबई विद्यापीठाचे पालघर येथे उपकेंद्र, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे परभणी येथे उपकेंद्र, शिवाजी विद्यापीठाचे खानापूर येथे उपकेंद्र तसेच अमरावती विद्यापीठाचे अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम येथे उपकेंद्रे स्थापन करण्याची मागणी करण्यात येत आहे. उपपरिसर/उपकेंद्र सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम 2016 मधील कलम 5 (10) नुसार विद्यापीठाला उपपरिसर स्थापन करण्याचा अधिकार आहे. तथापि, विद्यापीठ निधीतून उपकेंद्र सुरु करणे शक्य होत नसल्याने उपकेंद्र सुरु करण्यास मान्यता देऊन आवश्यक जागा व निधीची सुध्दा मागणी करण्यात येते.सदरहू उपकेंद्रामध्ये विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच विविध अर्ज भरण्याची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात येते. याशिवाय महाविद्यालयांना संलग्नता अर्ज व शुल्क भरण्याची सुविधा प्राप्त होते. विद्यार्थी व संलग्नित महाविद्यालय यांची प्रशासकीय व शैक्षणिक कामे उपकेंद्रामध्ये झाल्याने वेळेची व पैशाची बचत होते. उपपरिसर/उपकेंद्र सुरु करण्याबाबतची वाढती मागणी विचारात घेऊन, सद्यस्थितीत सुरु असलेल्या उपपरिसरांची सद्यस्थिती काय आहे तसेच प्रस्तावित उपकेंद्राची आवश्यकता कशा पध्दतीने आहे, या बाबींसह विद्यापीठनिहाय उपकेंद्र सुरु करावयाचे झाल्यास आवर्ती व अनावर्ती निधीची व जागेची आवश्यकता याबाबत सुसंगत धोरण तयार करण्यासाठी प्र-कुलगुरु मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.28.08.2023 रोजी

समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये डॉ.एम.एस.कुऱ्हाडे, संचालक, संस्कार सर्जन सोसायटी, मुंबई, डॉ.शिवशरण माळी, कुलगुरुंचे सल्लागार एम.आय.टी. विद्यापीठ, पुणे, श्री.दिलिप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, श्री.बी.पी.पाटील, परिक्षा संचालक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा समावेश आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०४० पुढीलप्रमाणे आहे.:-

अमरावती जिल्ह्यातील काही तालुके जसे की मेळघाट क्षेत्र धारणी व चिखलदरा तालुक्यातील काही गावांमध्ये सध्या ही पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असणे, तर काही गावांमध्ये दूरवरून विहिरीवरून पिण्याचे पाणी आदिवासी महिला, पुरुष मंडळी डोक्यावर पाणी आणतात त्यामध्ये त्यांचा पूर्ण दिवस जाऊन त्यांची मजुरी पडते त्यामुळे पैसे नसल्याने उपासमार होते असे विदारक चित्र असणे, हातपंप कोरडे पडले असणे, मंजूर असलेल्या पाणी पुरवठा योजना अजूनही सुरू झाल्या नसणे, महिला व लहान मुले, यांना पिण्याचे पाणी दूरवरून डोक्यावर आणावे लागत असल्याने मोठ्या प्रमाणावर हालअपेष्टा सहन कराव्या लागत असणे. त्यामुळे या संबंधाने शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, नळयोजना कार्यान्वित करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. गुलाबराव पाटील, मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन

अमरावती जिल्ह्यात मेळघाट क्षेत्र धारणी व चिखलदरा तालुक्यात सन २०२४-२५ च्या पाणीटंचाई अंतर्गत ११ गावांना २० टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. सद्यस्थितीत मेळघाट क्षेत्रातील टँकरद्वारे पाणी पुरवठा पूर्णतः बंद करण्यात आला आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत अमरावती जिल्ह्यामध्ये एकूण ६६१ नळ पाणी पुरवठा योजना मंजूर झालेल्या असून, त्यापैकी भौतिकदृष्ट्या ६३७ योजनांची कामे पुर्ण झाली आहेत. उर्वरित २४ योजना प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील योजनांची कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

अमरावती जिल्ह्यात मेळघाट क्षेत्र धारणी व चिखलदरा तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त ११ गावापैकी, मौजे तारुबांदा व मौजे खिरपणी गावात जिल्हा परिषदेतर्फे पाणीपुरवठा योजनेचे काम करण्यात येत असून, तारुबादा येथील योजनेचे काम पूर्ण होवूनही उन्हाळयात भूजल पातळी खाली गेल्याने योजनेतील विहीर कोरडी पडली. खिरपणी गावातील योजनेस वनविभागाची परवानगी विलंबाने मिळाल्याने सध्या योजनेचे काम प्रगतीपथावर असून, ८०% काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ९ गावांमध्ये (आकी, खडीमल, मोथा, लवादा, गौलखेडा बाजार, मेहरिअम, बहादरपूर, कोरडा व आलाडोह) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अमरावती मार्फत प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. मेळघाट क्षेत्र धारणी व चिखलदरा तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण ७ प्रादेशिक योजनाची कामे प्रगतीपथावर असून त्यात १०४ गावांचा समावेश आहे. सदरहू योजना पुर्ण झाल्यानंतर या भागातील पाणी टंचाई दुर होण्यास निश्चित मदत होईल.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

डॉ. नितिन राऊत, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४२ पुढीलप्रमाणे आहे.:-

विदर्भातील पहिल्या उप्पलवाडी औद्योगिक वसाहतीत राज्यसरकारने ६२ वर्षानंतरही अद्ययावत पायाभूत सुविधा उभारल्या नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, उक्त वसाहतीतील डांबरी रस्ते भारी वाहनांचे वजन पेलू शकत नसणे, रस्त्यांच्या व इतरही सोयी सुविधांच्या अभावामुळे कामगारांना येथील रस्त्यांवरुन मार्ग काढणे कठीण होत नसणे, या औद्योगिक वसाहतीत १०० युनिट सुरु असुन ५ ते ६ हजार लोकांना रोजगार मिळत असणे, या औद्योगिक वसाहतीच्या पायाभूत सुविधांसाठी २०० कोटीच्या निधीची मागणी करुनही अद्यापही निधी मिळाला नसल्याने या वसाहतीतील मुख्य मार्गावरुन कोराडी थर्मल पावर स्टेशनमधून राख भरुन धावणारे भारी वाहनांचे वजन येथील डांबरी रस्ते झेलत नसल्याने जागोजागी रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे पडले असल्याने वांरवारं या रस्त्यांवर अपघाताच्या घटना घडत असणे, यामुळे या वसाहतीतील कामगार, वाहनचालक तसेच इतरही नागरिकांमध्ये निर्माण झालेली भिती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

नागपूर जिल्हयातील सर्वात जुनी नागपूर औद्योगिक सहकारी संस्थेची स्थापना सन 1961 मध्ये झालेली आहे. संस्थेचे एकूण क्षेत्रफळ 8.64 हेक्टर आहे. संस्थेचा मंजूर आराखडा दिनांक 16.07.1985 रोजी झालेला आहे. संस्थेची जमीन ही शासकीय असून भाडेपट्ट्यावर संस्थेला देण्यात आलेली आहे. नागपूर औद्योगिक सहकारी वसाहत संस्थेचे एकूण अंदाजित गुंतवणूक रु. 160 कोटी असून 1784 रोजगार निर्मिती झालेली आहे. सदर भूखंडावर एकूण 95 भूखंड आरेखित करण्यात आलेले असून एकूण 42 उद्योग घटक कार्यरत आहेत.

उद्योग विभागाच्या 25.02.2014 च्या शासन निर्णयान्वये औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांची निर्मिती व विकासाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचे वाटप करण्यासाठी कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आली आहेत. सदर योजनेअंतर्गत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्राप्त झालेले प्रस्तावांची तपासणी उद्योग संचालनालयामार्फत करण्यात येते. त्याअंतर्गत प्रस्ताव सादर केलेल्या संस्थेने सुकाणू समितीने प्रस्तावांना मान्यता दिल्यानंतर सहकारी औद्योगिक संस्थेने स्वहिश्याची 25 टक्के रक्कम कार्यान्वयन यंत्रणेकडे जमा केल्यानंतरच प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करुन संस्थेस शासन हिस्स्याचा 75 टक्के निधी वितरीत करण्यात येतो. या योजनेंतर्गत नागपूर औद्योगिक सहकारी वसाहत या वसाहतीचा रस्ते बांधकाम व सांडपाणी वितरीकेकरीता व नाल्यांलगतच्या कामांकरीता सन 2014 मध्ये रु.269.40 लक्ष रकमेचा प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर या कार्यालयात सादर करण्यात आला होता. तथापि, सदर औद्योगिक वसाहतीने 25% स्व:हिश्याची रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सदर प्रस्ताव पुढील मंजूरीसाठी शासनास सादर करण्यात आलेला नाही. तद्नंतर नागपूर औद्योगिक सहकारी वसाहत, उप्पलवाडी येथील रस्ते बांधकाम व सांडपाणी वितरीका इत्यादी सुविधा

पुरविण्याकरीता माहे नोव्हेंबर, 2022 मध्ये रु.433.82 लक्ष एवढ्या खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक सादर केले होते. परंतु सदर औद्योगिक वसाहतीने 25% स्व:हिश्याची रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सदर प्रस्ताव प्रलंबित आहे.

सन 2024 मध्ये जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री यांनी सदर 25% स्वहिस्सा जिल्ह्यातील इतर कोणत्या निधीमधून पूर्ण करता येईल याची तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, नागपूर यांना दिले आहेत. सदर कामांचे अद्ययावत व परिपूर्ण अंदाजपत्रक तयार करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, नागपूर यांनी नागपूर सहकारी औद्योगिक वसाहत, उप्पलवाडी यांना दिले आहेत. तसेच त्यानुसार सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यासाठी जिल्हा उद्योग, केंद्र, नागपूर यांनी मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नागपूर यांना पत्राद्वारे कळविले आहे. नागपूर सहकारी औद्योगिक वसाहत, उप्पलवाडी यांचे सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर व स्वहिश्याची 25% रक्कम शासनाकडे भरण्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास योजनेंतर्गत सदर औद्योगिक वसाहतीच्या कामांबाबतच्या प्रस्तावावर योजनेतील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ व्दितीय अधिवेशन

१७४०

श्री. तुकाराम काते विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १७४० पुढीलप्रमाणे आहे

"न .भू क्र .४६९- अ चेंबूर येथील महाराष्ट्र शासनाच्या येथील शासकीय जागा बांधा वापरा हस्तांतर करा या तत्त्वावर सध्याच्या हब टाऊन या खाजगी कंपनीला ज्या अटी आणि शर्तीवर देण्यात आली त्या सर्व अटी आणि शर्तीचे सदरच्या खाजगी विकासाच्या कंपनीने उल्लंघन केले असणे अटी व शर्तीनुसार सदर विकासकामे सर्वप्रथम सर्व शासकीय इमारतींचे बांधकाम करून देणे कमप्राप्त असणे त्यामध्ये भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृह व इतरही शासकीय कार्यालयांच्या इमारतींचा समावेश असणे परंतु व सर्व इमारतींचे बांधकाम अत्यंत संथ गतीने करत असणे कधी कधी तर ते बांधकाम बंदच ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असणे या विकासकाने सदरचे बांधकाम बंद ठेवून त्याने त्याच्या स्वतःच्या विक्री करंता असलेल्या इमारतीचे व त्यामधील व्यापारी गाळे या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून स्वतःचा फायदा केला असणे शासकीय इमारतींचे अटी आणि शर्तीचेनुसार कालावधीत पूर्ण करून देणे कम प्राप्त असणे भारतरत्न परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभागृहाचे बांधकाम हे विकासक पूर्ण करत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब असून त्यांनी शासकीय जागा ज्या अटी व शर्ती वर विकास करण्यासाठी घेतलेले आहे त्यांचे उल्लंघन केले असून त्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया".

.....

मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

चेंबुर न.भू.क्र. ४६९-अ येथील शासनाच्या मालकीच्या एकूण १,१३,९२४.२० चौ. मी. भूखंडाच्या विकासापोटी सन-२००८ मध्ये केलेल्या करारनाम्यानुसार शासन व विकासक यांना प्राप्त होणाऱ्या भूखंडाचे क्षेत्रफळाची अनुक्रमे ६९,९१९.५४ चौ.मी. व ४०,००० चौ. मी. अशी विभागणी करण्यात आली आहे.

तसेच या करारनाम्यानुसार विकासकाने शासनास एकूण १,४१,२४९.०८ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ बांधून द्यावयाचे आहे. यामध्ये १) महिला व बालविकास विभागासाठी पुरूष भिक्षेकरी गृह - ६५९४.६७ चौ.मी., महिला भिक्षेकरी गृह -४३४७ चौ.मी., शासकीय निवासस्थाने (टाईप-१,२,३) - ६२८४.२३चौ.मी., कस्तुरबा महिला वसतिगृह -१०८६ चौ.मी., रस्त्यावरील मुलांकरिता शाळा व वसतिगृह- ६००० चौ.मी., बालसंकुल १०९८.२४ चौ.मी, शवागृह ४० चौ.मी. असे **एकूण २५४५०.१४ चौ.मी.** बांधकाम क्षेत्रफळ २) सामाजिक न्याय व समाज कल्याण विभाग- मुलांकरीता वसतिगृह- १८१५१ चौ.मी., मुलीकरीता वसतिगृह- ६०७८ चौ.मी., औद्योगिक प्रशिक्षण संस्था – १७७७.२० चौ.मी., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन – ७६२९.७८ चौ.मी. असे **एकूण ३३,६३५.९८ चौ. मी.** बांधकाम क्षेत्रफळ ३) सामान्य प्रशासन विभाग व इतर विभाग -**७७,८९२.०८ चौ. मी.** बांधकाम क्षेत्रफळ, ४) विश्रामगृह- **४,२७०.८८ चौ.मी.** बांधकाम क्षेत्रफळ अंर्तभूत आहे.

या प्रकल्पांतील एकूण १४ शासकीय इमारतीचे काम विकासकामार्फत हाती घेण्यात आले आहे. या १४ इमारतीपैकी ९ इमारतींचे काम पूर्ण झाले आहे. पूर्ण झालेल्या इमारतीमध्ये महिला व बालाविकास विभागाच्या ०५ इमारती व समाज कल्याण विभागाच्या ३ इमारती व सा.बां.विभागाचे १ विश्रामगृह इत्यादीचा समावेश आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन (४८ % पूर्ण) व प्रशासकीय इमारत (२२ % पूर्ण) या २ इमारतींचे काम प्रगतिपथावर आहे. उर्वरित महिला व बालविकास विभागाच्या ३

इमारतींचे काम अतिक्रमण व अस्तित्वातील वापरात असलेल्या जुन्या वसतीगृहामुळे सुरू करण्यात आलेले नाही. आजमितीला विकासकाने शासनास एकूण ४७,५४३.२२ चौ.मी.बांधकाम क्षेत्रफळ उपलब्ध करून दिलेले आहे.

करारनाम्याप्रमाणे या प्रकल्पाची एकूण किंमत रू.४५१.५० कोटी एवढी आहे. करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार शासकीय बांधकामाच्या एकूण किंमतीपैकी विकासकाने पूर्ण केलेल्या बांधकामाच्या किंमतीच्या प्रमाणामध्ये विकासकास टप्याटप्याने भाडेतत्वावर भूखंड क्षेत्रफळ देण्याची तरतूद आहे. आजमितीला विकासकाने शासनास करारनाम्यानुसार आजमितीस रू.१८२.०८ कोटी एवढया किंमतीचे बांधकाम करून दिलेले आहे. त्याबदल्यात विकासकास करारनाम्यानुसार आजमितीस एकूण ४०,००० चौ.मी. पैकी १६१०० चौ.मी. एवढे भूखंड क्षेत्रफळ भाडेपट्टयाने देण्यात आलेले आहे. विकासकास भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या भूखंडावर विकासकामार्फत त्यांना अनुज्ञेय होणाऱ्या एफ.एस.आय. प्रमाणे निवासी व वाणिज्य वापरासाठी इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश दि.२७.०६.२००८ रोजी देण्यात आला असून काम पूर्ण करण्यांचा कालावधी ४२ महिने एवढा होता. या प्रकल्पाच्या कामी भूखंडावरील आरक्षणात बदल, स्थानिक लोकांचा विरोध व मांडणी आराखड्यात बदल, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशकास मान्यता, हेरिटेज आरक्षण, अनधिकृत शासकीय रहिवाशांचे निष्कासन, अस्तित्वातील झाडे व भुखंडावर जुन्या अस्तित्वातील शासकीय इमारतींचा अडथळा, कोविड- १९ चा प्रादुर्भाव, नदीच्या वाळूचा उपसा करण्यावरील बंदी इत्यादी कारणांमुळे विलंब झालेला आहे. तसेच सद्यस्थितीतील भूखंडाच्या दक्षिण भागावर असलेली अतिक्रमणे, थ्री.आर. सोसायटी अतिक्रमण, प्रलंबित जलदेयके इत्यादी अडचणी दूर करण्याच्या अनुषंगाने शासन व विकासकामार्फत कार्यवाही प्रगतीत असून प्रकल्पाचे उर्वरित बांधकाम डिसेंबर २०२७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. आमश्या पाडवी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९१२ पुढीलप्रमाणे आहे.:-

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव ते तळोदा ह्या रस्त्याचे अंतर चांदसैली घाट मार्गाने तळोदा शहराचे अंतर ४४ किमी असणे, धडगांव ते बिजरी या गावांचे अंतर ९ कि.मी असणे, बिजरी ते खर्डी या गावांचे अंतर ७ कि.मी असणे, हा संपूर्ण रस्ता अतिशय चढ-उताराचा व वळणदार असणे, त्यामुळे वारंवार या रस्त्यावर अपघाताच्या दुर्घटना घडणे, या अपघातांमध्ये अनेक वेळा प्रवाशी व वाहनधारक जखमी होणे, धडगाव ते तळोदा हा रस्ता सुमारे ३० किलोमीटर पेक्षा जास्त घाट रस्ता असल्याने या रस्त्यावर पावसाळ्यात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळून अनेक दिवसांपर्यंत रस्ता बंद पडणे, परिणामी सातपुड्याच्या पर्वत रांगेतील जनतेचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क तुटणे, त्यामुळे धडगांव ते बिजरी व बिजरी ते खर्डी या दरम्यान बिजरी ते दोदया, दोदया ते खर्डा, खर्डा ते राणीपूर या रस्त्यादरम्यान बोगदा बनविल्यास नंदुरबार जिल्हा मुख्यालयाचे अंतर कमी होणे, पर्यायाने जनतेचा वेळ आणि पैसा या दोन्हींची बचत होणे, अति तीव्र चढ उताराच्या रस्त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणे या करिता सातपुड्याच्या कुशीतील वरीलप्रमाणे रस्त्यावर बोगदे करण्याची मागणी असणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

मा. मंत्री (सा.बां.) (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

नंदूरबार जिल्हयातील धडगांव ते तळोदा दरम्यान चांदसैली घाट मार्गे अंतर 44 कि.मी. आहे. या पैकी सर्वसाधारणपणे 20 कि.मी. लांबी ही घाट रस्ता असुन सातपुडा पर्वतरांगाच्या दुर्गम भागातून जाते. पावसाळ्यामध्ये अतिवृष्टी झाल्यास दरडी कोसळल्यास रस्त्यावरील वाहतूक काही कालावधी करिता खंडीत होते. तथापि, विभागामार्फत त्वरित दरडी हटविण्याचे काम करुन रस्ता वाहतूकी करिता सुरळीत करण्यात येतो.

बिजरी ते दोदया ते खर्डी, खर्डी ते राणीपूर या दरम्यान बिजरी ते खर्डी (अलवान) ही पूर्ण लांबी वन क्षेत्रातून जाते. या लांबीत अस्तित्वात अथवा वापरात रस्ता नाही.

सद्यस्थितीत बिजरी ते खर्डी दरम्यान बोगद्याचे काम शासन स्तरावर विचाराधीन नाही. सदर लांबीत बोगद्याच्या कामाची सुसाहयता तपासून पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन राहिल.

******

१९१५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक १९१५

श्री.आमश्या पाडवी, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९१५ पुढीलप्रमाणे आहे :-

"नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २०२० ते २०२३ मध्ये ३६ रस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यात येणे, परंतु अद्यापपर्यंत २०२५ वर्षे सुरू होऊन देखील सदर कामांना सुरुवात देखील न होणे, अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील बराचसा भाग अतिदुर्गम व डोंगराळ असणे, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २०२० ते २०२३ या चार वर्षांमध्ये रस्त्याची कामे मंजूर असून देखील अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील शेकडो गावे व पाडे रस्त्यापासून वंचित असणे, वक्त गावांना जोडणारे रस्त्यांचे जाळे तयार करण्यासाठी निधी उपलब्ध करून देऊन रस्त्यांचे काम सुरू करण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून व स्थानिक लोकप्रतिनिधीकडून शासनाकडे वारंवार केलेली असणे, सदर ३६ रस्त्यांच्या कामांपैकी अक्कलकुवा तालुक्यातील ५ कामे मंजूर असून जिथे कामे मंजूर आहेत तिथे न करता इतरत्र कामे केलेली असणे, सदर तालुक्यातील अधिकारी आणि ठेकेदार यांचा मनमानी कारभार सुरू असणे, सदर तालुक्यातील गावे व पाडे रस्त्यांच्या कामाअभावी वंचित असणे, वारंवार मागणी तक्रार करून सुद्धा शासनाने कारवाई न करणे, परिणामी अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना कारवाई व यावर शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (सा.बां.) (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगांव या तालुक्यातील कार्यक्षेत्रात सन 2020 ते 2023 या कालावधीतील 36 कामे मंजूर आहेत. सदर कामांपैकी ५ कामांकरिता वन विभागाची आवश्यक परवानगी प्राप्त करुन कामे लवकरच सुरु करण्यात येत आहेत. तसेच प्रगतीत असलेल्या ५ कामांमधील आवश्यक लांबीत वन विभागाची परवानगी प्राप्त करुन पुढील काम कार्यान्वित करण्यात येत आहे. उर्वरीत २६ प्रगतीतील कामांच्या भौतिक प्रगतीवर अंशत: परिणाम झाला आहे.

सदर कामे ही विहीत केलेल्या करारनाम्याच्या तरतूदीनुसार करण्यात येत आहेत. सदर कामांपैकी सुरु असलेली कामे मंजूर लांबीतच करण्यात आली असून, इतरत्र करण्यात आलेली नाहीत. कामाच्या करारनाम्यातील तरतुदीनुसार संबंधीत कंत्राटदारावर कार्यवाही करुन विहित मुदतीत कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सुचना क्र.१०६४

मा.श्री.साजिद पठाण, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विकास ठाकरे, श्री. विश्वजित कदम, श्री. अस्लम शेख, श्री. अमिन पटेल, श्रीमती ज्योती गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०६४ पुढीलप्रमाणे आहे:-

""वित्त व नियोजन विभाग, सन २००१ मध्ये डॉ. भांडे समितीचा रिपोर्ट आल्यावर तब्बल २० वर्षांनी राज्य शासनाने सन २०१९ मध्ये अहवाल स्विकारला असणे, असे असतांनाही राज्यातील धोबी समाजाला सन २००१ मध्ये डॉ.भांडे समितीच्या तिस-या अहवालातील शिफारशीनुसार तात्काळ सवलती प्रामुख्याने आरक्षण देण्यास विलंब होत असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, समितीच्या तिस-या शिफारशीमध्ये स्पष्ट उल्लेख असतानाही धोबी समाजाला त्या समाजाच्या संख्येच्या प्रमाणात तत्सम सवलती लागू करण्याची आवश्यकता असणे, धोबी समाजाला कुठलेही आरक्षण न देता फक्त अन्याय सुरु असणे, बार्टीच्या अहवालाची आवश्यकता नसतानाही शासनाकडून त्याबाबत आग्रह धरण्यात येणे, मागील अनेक वर्षांपासून धोबी समाजाचे आरक्षण प्रलंबित असणे, आरक्षणास होत असलेल्या विलंबामुळे धोबी समाजातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोष लक्षात घेता शासनाने धोबी समाजाला त्वरीत आरक्षण मिळवून देण्याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया.""

मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे निवेदन

'धोबी' जातीचा समावेश इतर मागासवर्ग जाती यादीमध्ये अ.क्र.१२५ वर करण्यात आला आहे. या जातीच्या नागरिकांना सध्या इतर मागासवर्गीयांसाठी अनुज्ञेय असलेले लाभ देय आहेत. 'धोबी' जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादीत करावा किंवा कसे याकरिता शासन निर्णय, दि.०५.०९.२००१ अन्वये डॉ. डी. एम. भांडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दि.०५.०३.२००२ रोजी शासनास अहवाल सादर केला होता. तदनंतर, तत्कालीन मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने सदर अहवालावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अभिप्राय घेण्याचा निर्णय घेतला.

डॉ.भांडे समिती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अहवाल राज्य शासनाच्या दि.१३.०४.२००५ च्या पत्रान्वये पुढील उचित कार्यवाहीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले होते. त्यानुषंगाने केंद्र शासनाने दि.०३.०५.२००५ च्या पत्रान्वये सविस्तर जातीय अभ्यासाच्या माहितीसह विहीत नमून्यात केंद्र सरकारकडे प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत राज्य शासनास कळविले होते.

राज्य शासनाच्या दि.०४.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास डॉ. भांडे समितीचा अहवाल विचारात घेण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने केंद्र शासनाने दि.०१.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दि.०३.०५.२००५ च्या पत्रासोबतच्या विहित विवरणपत्रामधील माहितीसह सुधारित प्रस्ताव

सादर करण्यास कळविले होते. त्यास अनुसरुन शासन पत्र, दि.२२.१०.२०२१ अन्वये केंद्र शासनास सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावास भारताचे रजिस्ट्रार जनरल व सेन्सस कमिश्नर (ORGI) यांनी दि.१७.०६.२०२२ अन्वये समर्थन दिलेले नसल्याचे सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.२९.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास कळविले असून, सदर प्रस्तावाचे पुनर्विलोकन करण्याबाबत किंवा भारताचे रजिस्ट्रार जनरल व सेन्सस कमिश्नर (ORGI) यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने पुन्हाः सविस्तर माहितीसह प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. त्यास अनुसरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी सादर केलेला अहवाल राज्य शासनाच्या दि.२१.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. केंद्र शासनाच्या दि.२७.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या यादीत धोबी जातीचा समावेश करण्यासंदर्भात भारताचे रजिस्ट्रार जनरल व सेन्सस कमिश्नर (ORGI) यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या समर्थनार्थ आवश्यक ती माहिती सादर करण्याबाबत शासन पत्र, दि.२३.०१.२०२५ अन्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांना कळविण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचेकडून शासनास अहवाल प्राप्त झाला असून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

अनुसूचित जातीच्या यादीत कोणत्या जातीचा समावेश करण्यात यावा किंवा वगळण्यात यावा, याबाबतचे अधिकार राज्य घटनेच्या अनुच्छेद ३४१ नुसार केंद्र शासनास आहेत.

*****

लक्षवेधी सूचना क्र. २१८५

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. नरेंद्र भोंडेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:

"एन.बी.बी. मागासवर्गीय सहकारी संस्था मर्यादित भंडारा, या नोंदणीकृत संस्थेला कातडी कामविणे या प्रकल्पाकरीता रुपये ६९४ लक्ष इतके कर्ज मंजूर झाले असणे, शासनाकडून ७०% रक्कम संस्थेला दिली असणे, शासनाकडून प्राप्त ७०% रकमेतून प्रकल्प उभारणी व आवश्यक मशिनरीची खरेदी केली असणे, संस्थेला प्राप्त रकमेचे पहिल्या व दुसऱ्या व अंतीम हफ्त्याचे उपयोगीता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी भंडारा यांनी सादर केले असणे, संस्थेने १०/१२/२०१३ ते १८/१२/२०१४ या कालावधीमध्ये सर्व यंत्र फिटींग करुन प्रकल्प सुरु केला असणे, प्रकल्प २०१८ पर्यंत सुरळीत चालू असणे, महाराष्ट्र राज्याचे अधिनियम दिनांक ४ मार्च २०१५ अन्वये प्राणी सरंक्षण या कायद्यानुसार राज्यात गायीची व बैलाची कत्तल करणे यावर बंदी आणली असल्याने प्रकल्पाकरीता लागणाऱ्या कच्च्या मालाचा तुटवडा बाजारात निर्माण होणे, कच्च्या मालाअभावी वित्तीय संस्थेकडून प्रकल्पाचे शिल्लक २५% कर्जाची रक्कम अप्राप्त असणे, सबब व्यवसाय चालविणे आर्थीकदृष्टीने परवडण्यासारखे नसल्याने सदर प्रकल्प संस्थेमार्फेत बंद करण्यात आला असणे, परिणामी कर्जाची परतफेड करणे शक्य नसणे, संस्थेकडून कर्जमाफीची मागणी करण्यात आली असणे, शासनाच्या अधिनियमानुसार या प्रकल्पावर गदा आली असणे, पर्यायाने कर्जमाफी होणे आवश्यक असणे, यावर शासनाने केलीली उपाययोजना तसेच करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे निवेदन

अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली असून दिनांक २२ मे, २००८ रोजी सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर योजनेंतर्गत एन. बी. बी. मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, भंडारा या संस्थेच्या कातडी कमावण्याच्या (Tannery) रुपये ६९४.५४ लक्ष इतक्या प्रकल्प मुल्यास दिनांक ३१ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयान्वये तसेच, दिनांक १९ मार्च, २०१३ व दिनांक ०१ ऑगस्ट, २०१३ अन्वये भागभांडवल व दीर्घ मुदतीच्या कर्जापोटी एकूण रुपये ४८६.१६ लक्ष मंजूर करुन सदर रकमेची संस्थेस उचल देण्यात आलेली आहे. सदर अर्थसहाय्यापैकी पहिल्या हप्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र दिनांक ०६ डिसेंबर, २०१२ रोजी तर दूसऱ्या आणि तिसऱ्या/अंतिम हप्त्याच्या अर्थसहाय्याचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रभारी जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दिलेले उपयोगिता प्रमाणपत्र सदर संस्थेने सादर केलेले आहे.

सदर योजनेसंदर्भात विहित तरतूदीनुसार सदर संस्थेने भागभांडवलाची रक्कम प्रकल्प पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून १० समान हप्त्यात १० वर्षात शासनास परत करणे आवश्यक होते. तसेच, कर्जाची परतफेड संस्थेच्या देय असलेल्या प्रकल्प मुल्याच्या ७०% रक्कम अदा केल्यानंतर २ वर्षांनी सुरु करणे आवश्यक होते. त्यानुसार सदर संस्थेचा प्रकल्प दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी पूर्ण झाल्यानंतर संस्थेने सन २०१५ पासून भागभांडवल शासनास परतफेड

करणे आवश्यक होते. सदर संस्थेस तिच्या प्रकल्प मुल्याच्या ७०% देय असलेली रक्कम दिनांक १० डिसेंबर, २०१३ रोजी अदा केल्यानंतर २ (दोन) वर्षानी म्हणजेच सन २०१५ पासून संस्थेने दीर्घ मुदतीच्या कर्जाचे परतफेड शासनास करणे आवश्यक होते. सदर संस्थेचा प्रकल्प सन २०१४ ते २०१८ पर्यंत सुव्यवस्थित/सुस्थितीत सुरु होता. थोडक्यात, सदर संस्थेचा प्रकल्प सन २०१५ मध्ये सुव्यवस्थित/सुस्थितीत सुरु असतानाही सदर संस्थेने शासनाने दिलेल्या अर्थसहाय्याची परतफेड केलेली नाही.

महाराष्ट्र राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी दिनांक ०४ मार्च, २०१५ पासून लागू झाल्यानंतर देखील सदर संस्थेचा प्रकल्प सन २०१४ ते सन २०१८ पर्यंत सुव्यवस्थित/ सुस्थितीत सुरु असल्यामुळे सदर संस्थेने शासनाने दिलेल्या अर्थसहाय्याची परतफेड करणे प्रस्तुत योजनेच्या तरतुदीप्रमाणे आवश्यक होते. जर सदर संस्थेने प्रस्तुत योजनेच्या तरतुदीप्रमाणे शासनाने दिलेले अर्थसहाय्य परतफेड केले असते, तर सन २०१४ ते २०१८ या वर्षात संपूर्ण दीर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड झाली असती आणि भागभांडवलापैकी जवळजवळ रुपये १००.०० लक्ष इतक्या रक्कमेची परतफेड झाली असती. अशाप्रकारे सदर संस्थेस शासनाने दिलेल्या रुपये ४८६.१६ लक्ष इतक्या अर्थसहाय्यापैकी रुपये ३४३.१६ लक्ष इतके अर्थसहाय्य परतफेड झाले असते. तथापि, सदर संस्थेने कुठलीही अर्थसहाय्याची परतफेड केलेली नाही.

प्राणी रक्षण अधिनियम निर्बंधामुळे बाजारपेठेत प्राण्यांच्या कातडीअभावी (चामडी) व्यवसाय डबघाईस आल्याने विशेष बाब म्हणून भागभांडवलासह संपूर्ण कर्जमाफी मिळण्याबाबत अध्यक्ष, एन. बी. बी. मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, भंडारा यांनी शासनास दिलेल्या दिनांक ३० डिसेंबर, २०२२ यांनी शासनास विनंती केली होती. त्यास अनुसरुन याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश प्राप्त झाले होते.

त्यास अनुसरून, नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असता त्या विभागांनी "सदर संस्थेचे शासकीय भागभांडवल आणि त्यावरील व्याज व दंडनिय व्याज माफ केल्यास इतर प्रशासकीय विभागाच्या संस्थांदेखील अशाच प्रकारची मागणी करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच, शासनाने दिलेले अर्थसहाय्य माफ केल्याने एक अनिष्ट पायंडा पडेल. विभागाने शासकीय अर्थसहाय्याच्या थकीत रकमेची वसूली होण्यासाठी कठोर धोरण स्वीकारणे आवश्यक आहे, संस्थेने खरेदी केलेल्या यंत्रसामुग्रीचा लिलाव करुन प्राप्त होणारी रक्कम शासनाच्या एकत्रित निधीमध्ये योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी, करारनाम्यातील अट क्रमांक २० प्रमाणे संस्थेची जमीनीची विक्री जिल्हाधिकारी, भंडारा यांच्यामार्फत करण्यात येऊन, प्राप्त होणारी रक्कम शासनाच्या एकत्रित निधीमध्ये योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी. तसेच, अट क्रमांक २१ प्रमाणे संचालक मंडळाला थकीत कर्जासाठी जबाबदार धरुन शासनाने दिलेल्या कर्ज व भागभांडवलाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात यावी", असे अभिप्राय देऊन सदर प्रस्ताव मा. मंत्रिमंडळासमोर निर्णयार्थ सादर करण्यास असहमती दर्शविलेली आहे.

****

H/658 - 19

लक्षवेधी सूचना क्र. १४५४

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

श्री. संजय मेश्राम, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४५४ पुढीलप्रमाणे:-

"मो.थूटानबोरी ता भिवापूर जि.नागपूर हे गाव गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्पामध्ये संपादित असून या गावचे पुनवर्सन अंदाजे ४५ ते ५० कि मी अंतरावर नवेगाव देशमुख व्या शिवारात झालेले अराणे, तरोव यावाधित गावातील ७०.७३% शेतजमीन गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्पामध्ये संपादित केली अराणे, तसेव सदर गावामध्ये १९ शेती खातेदार शिल्लक असून त्यावी शेती १३.०३ हेक्टर शिल्लक असणे, पुनर्वसन ठिकाण ४५ ते ५० कि मी अंतरावर असल्यामुळे शेत जमीन कसणे शक्य नसणे, तसेच उमरेड कन्हाडला अभयारण्य शेतीला लागून असल्यामुळे जनावरामुळे पिकावी नुकसान शेतकऱ्यावी जीवित हानी होत असणे, थूटानबोरी येथे अंदाजे ७० कुटुंव वास्तव्य करत असून या गावात शासनाने नागरी सुविधा वंद केल्या असणे, सदर गावात सन २०१५ पासून विद्युत लाईन, शाळा, अंगणवाडी शासकीय कार्यालय वंद केले असणे, सभोवताली पाणी असल्यामुळे जलजन्य आजार तसेच जल प्राण्यापासून जीवित होण्याची शक्यता असणे, शेत जमिनीचा निपटारा होईपर्यंत या गावातील सर्व नागरी सुविधा चालू करून देण्यात याव्या तसेच सुमारे १३.०३ हेक्टर शेती गोसेखुर्द किवा उमरेड कन्हाडला अभयरण्यामध्ये संपादन लवकर करावे अशी मागणी ग्रामस्थानी शासनाकडे केली अराणे, अन्यथा १९ खातेदार तहसीलकार्यालय समोर वेमुदत उपोषणाला वसण्याचा इशारा देण्यात आला असणे, परंतु शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याने सदर शेतकऱ्यांची शासनाव्या विरोधात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

मा. मंत्री(जलसंपदा)(विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन:-

मौ. थूटानवोरी ता. भिवापूर जि. नागपूर हे गाव गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्पामध्ये संपादित असून या गावचे पुनवर्सन २१ कि.मी अंतरावर नवेगाव देशमुख येथे झालेले आहे. मौ. थूटानबोरी गावाची २७५. ६७ हे. आर शेतजमीन संपादित झाली असून, त्याबाबतचा मोवदला अदा करण्यात आला आहे.

सदर गावामध्ये १९ खातेदारांची १३.३२ हे.आर. शेती व तुकुमबोरी येथील दोन खातेदारांची ४.९२ हे.आर शेती शिल्लक असून असे एकूण १८.२४ हे.आर शेतजमिनीचा भूसंपादन प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. महामंडळाकडून प्राप्त प्रस्तावानुसार सदर बाबीवर धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्याने मौजे थुटानबोरी येथील १३.३२ हे. आर. तसेच मौजे तुकुमबोरी येथील

४.९२ हे. आर अशी एकूण १८.२४ हे. आर. शेतजमीन संपादनाचा रु. २९१.८४ लक्ष इतक्या रकमेचा प्रस्ताव महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागास अभिप्रायार्थ सादर केला आहे.

मौजा थूटानबोरी व तुकुमबोरी ही दोनही गावे उमरेड कऱ्हांड या राखीव वनाला लागून असल्याने १८.२४ हे. आर. जमिन वनविभागास विस्तारीत अभयारण्याकरिता हस्तांतरीत करणेबाबत किंवा मौजा थुटानबोरी पासून १० कि.मी. अंतरावर उमरेड कऱ्हांडला अभयारण्याचे जंगल सफारीचे प्रवेशद्वार आहे. तेथून मौजा थूटानबोरी पर्यंत रस्ता उपलब्ध असल्याने सदर जमीन पर्यटना करिता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना भाडेतत्वावर देऊन विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर विचाराधीन आहे.

मौजा थूटानबोरी, ता. भिवापूर , जि. नागपूर या गावाचे पुनर्वसन मौजा नवेगाव देशमुख येथे करण्यात आला असून मौजा थूटानबोरी येथील २६९ बाधित कुटुंबांपैकी २१४ कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत. त्यापैकी १२३ कुटुंबे पुनर्वसित स्थळी व ९१ कुटुंबे इतरत्र स्थलांतरित झालेली असून ५५ कुटुंबे स्थलांतरणास शिल्लक आहेत. मौजा थूटानबोरी येथील पुनर्वसित स्थळी सर्व नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. पुनर्वसित गावठाणामध्ये शाळा, अंगणवाडी इ. कामे करण्यात आलेली आहेत. मौजा थूटानबोरी या गावाचे पुर्णत: स्थलांतरण पुनर्वसित स्थळी करावयाचे असल्याने, बाधित गावठाणात नवीन व्यवस्था पुरविणेबाबतची तरतुद प्रचलित धोरणात नाही.

****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४७३ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यातील पत्रकारांच्या सामाजिक आर्थिक, व्यावसायिक हितासाठी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला बळकटी देण्याकरिता, इलेक्ट्रॉनिक डिजिटल आकाशवाणी इ.प्रसार माध्यमातून कार्यरत असलेल्या पूर्ण वेळ, अर्धवेळ, श्रमिक, अंशकालीन पत्रकारांची त्यांच्या अनुभव अनुरूप पत्रकारांसाठीचे शासन निर्णय, सन्मान योजना सुधारणा करून सर्वसमावेशक धोरण तयार करून पत्रकारांच्या कामगारांच्या कामाचे आर्थिक,आरोग्याच्या सुरक्षिततेबाबत करारनामा योग्यप्रकारे होईल याची पडताळणी करण्याकरिता मालक, पत्रकार, कामगार, सरकार यांची त्रिसदस्य समिती पत्रकार महामंडळांतर्गत स्थापन करून, कायम/कंत्राटी पत्रकार,पत्रकारेत्तर कर्मचारी वर्ग यांना काम,किमान वेतन,आरोग्य आदी सुरक्षा देणे, श्रमिक पत्रकार व पत्रकार कर्मचाऱ्यांचे रजिस्ट्रेशन हिताचे धोरण आखणी करण्याबरोबरच पत्रकारांचे प्रशिक्षण, संशोधन उपक्रम कार्यान्वित करून पत्रकारांना पुरस्कार प्रोत्साहन उपक्रम, स्पर्धाचे आयोजन करणे, माध्यमांकरीता नियमावली तयार करून केंद्र,राज्य सरकारच्या सुविधा गाव पातळीवरील माध्यम कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचवणे, पत्रकार क्षेत्रातील घुसेखोरी आराजकता रोखून चुकीच्या कृतीवर वेळीच आळा घालणे शक्य होण्याकरिता देशात पत्रकारांसाठी कल्याणकारी महामंडळाची गठन करण्याची घोषणा करण्यात येऊनही महामंडळ गठीत न होणे, राज्यातील अभ्यासू स्त्री-पुरुष पत्रकार कामगार, माहिती जनसंपर्क विभागातील कार्यक्षम अधिकारी यांचा समावेश करून मीडिया असोसिएशन ऑफ इंडिया व राज्यातील इतर पत्रकार संघटनेची मागणी लक्षात घेता पत्रकार कल्याणकारी महामंडळाची अंमलबजावणी करून त्याचे कार्यालय, अधिकारी, निधी यांची निश्चिती करून पत्रकारांसाठी आरोग्य विमा निवृत्तीवेतन अपघात विमा, निवासी सुविधा, शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे लागू करून जिल्हा, तालुका पातळीवर पत्रकारांना सुविधा पुरविण्याचे केंद्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्रात पत्रकारांचे हित जोपासण्यासाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर महामंडळ गठीत करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपायोजना."

मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन

केंद्र सरकारने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१.१२.२००८ रोजी असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारित केला आहे. केंद्र सरकारने असंघटित कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस (NDUW-National Database of Unorganized Workers) तयार करण्याचा निर्णय घेतलेला असून, असंघटित कामगारांची नोंदणी करण्याकरीता दिनांक २६.०८.२०२१ रोजी ई-श्रम पोर्टल सुरू करण्यात आले आहे. दि.16.०७.२०25 अखेर राज्यात ई-श्रम पोर्टलवर सुमारे १ कोटी ७८ लाख असंघटीत कामगारांनी नोंदणी केलेली आहे. त्यामध्ये

पत्रकारिता व इलेक्ट्रॉनिक मिडीया संबधित रोजगारामध्ये पत्रकारांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यांनाही ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करता येणार आहे.

राज्यातील असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा व विविध कल्याणकारी योजनांचे लाभ देण्यासाठी लवचिक कार्यपध्दती अवलंबण्याच्या दृष्टीने दि.०६.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्वसमावेशक असे "महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ" स्थापन करण्यात आले आहे. दि.०६.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मधील अनु.१० येथे पत्रकारिता व इलेक्ट्रॉनिक मिडीया संबधित रोजगारामध्ये पत्रकारांचा समावेश करण्यात आलेला असुन, भविष्यात या महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचे लाभ पत्रकारांचा तसेच त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणार आहेत.

तसेच, वृत्तपत्र आस्थापनेतील पत्रकार व पत्रकारेतर कर्मचारी यांच्यासाठी श्रमिक पत्रकार व पत्रकारेतर कर्मचारी (सेवाशर्ती) संकीर्ण अधिनियम, १९५५ हा कायदा लागू असून, वृत्तपत्र उद्योगात काम करणाऱ्या पत्रकार व पत्रकारेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेला कायदेशीर संरक्षण देवून त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी हा कायदा अस्तित्वात आलेला आहे.

श्रमिक पत्रकार व पत्रकारेतर कर्मचाऱ्यांचे वेतनाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने मजेठिया वेतन आयोगाची स्थापना करून सदर आयोगाचा निवाडा केंद्र शासनाने दि.११.११.२०११ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करून त्याच्या शिफारशी वृतपत्र आस्थापनांना लागू केलेल्या आहेत. त्यामुळे पत्रकार व पत्रकारेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनाला वेतन आयोगाचे कायदेशीर संरक्षण आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांना औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २ (एस) अन्वये कामगार या संज्ञेमध्ये समाविष्ट असून त्यांना कामगार कायद्यातील बोनस, उपदान, भविष्य निर्वाह निधी, वेतन प्रदान अधिनियम व इतर कामगार कायद्यांच्या तरतूदी लागू असून, त्यांना याद्वारे सामाजिक सुरक्षितता ही देण्यात आलेली आहे.

लक्षवेधी सूचना क्र.१७४८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. अभिजीत पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७४८ पुढील प्रमाणे आहे:-

"राज्यात आरोग्य विभागांतर्गत लसीकरण साठा करण्यासाठी शीत यंत्र उपकरणे खरेदी करण्यात येणे, सदर खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमिता व गैरव्यवहार झालेला असणे, सदर शीत यंत्र खरेदीमध्ये संबंधित ठेकेदार व अधिकारी यांच्यात आर्थिक संगनमत असल्याचे उघडकीस येणे, उच्चस्तरीय आधुनिक रौटोमोल्डेड आणि आरटीएमडी तंत्रज्ञानचे ice Lined refrigerator आणि Deep Freezers खरेदी करणेसाठी १२४ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रास शासनाची प्रशासकीय मान्यता घेणे, प्रत्यक्षात सदर उपकरणे खरेदी करतांना कमी गुणवत्ता असलेले उपकरणे खरेदी केल्याचेही निदर्शनास येणे, खुल्या बाजारात शीत यंत्र उपकरणाची किमत ७० ते ८० हजार असतांना सदर कंपनीने शीत यंत्र उपकरणे ३ लाख रुपयात खरेदी करणे, सदर उपकरणे खरेदीकरीता ७ निविदा आलेल्या असतांनाही संबधित अधिका-यांनी मर्जीतील अशोका स्थापत्य (गोदरेज कंपनी) आणि राहुल डिस्ट्रिब्युटर्स (वेस्टफ्रॉस्ट) या दोन ठेकेदार कंपनीला ६२ कोटींच्या निविदा मंजूर करणे, उपकरणे प्रत्येक आरोग्य केंद्रावर पोहाचणे बंधनकारक असतांना ते न पोहचताच बनावट कागदपत्राच्या आधारे ठेकेदाराला बिले अदा करणे, तसेच सदर अनियमितता व गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतरही ३१ मार्च, २०२५ अखेर २२ कोटी रुपयांची देयके अदा करण्यात येणे, यासर्व प्रकरणी तब्बल ६२ कोटींचा घोटाळा झालेला असणे, शासनाने यासर्व प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन दोषी असलेल्या संबंधित ठेकेदार व त्याला पाठिशी घालणा-या अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

राज्यातील आरोग्य संस्थेमध्ये नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत असलेल्या लसीकरणाशिवाय कोविड १९ लसीकरणाची लस मोहिम तसेच दरवर्षी राज्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम कार्यक्रम राबविण्यात येतो. त्यामुळे अशावेळी लसीची साठवणूकी करिता आरोग्य संस्थामध्ये लस साठा करावा लागतो, याकरिता Ice Line Refrigerator व Deep Freezer ची आवश्यकता भासते.

नवीन शीतसाखळी उपकरणे ILR (Ice Lined Refrigerator) आणि DF (Deep Freezer) खरेदी करिता आवश्यक रु. १२४,६९,६७,४०८/- इतके अनुदान पूरक मागणी द्वारे उपलब्ध होणेसाठी आवश्यक प्रस्ताव जून २०२४ मध्ये होणाऱ्या पावसाळी अधिवेशना करिता पाठविण्यात आला. पूरक मागणीद्वारे उपलब्ध होणारे अनुदान रु. १२४,६९,६७,४०८/- च्या अधीन राहून ILR (Ice Lined Refrigerator) एकूण १७०८ नग (small १६०८ नग व Large १०० नग) व DF (Large) एकूण १३८० नग खरेदीसाठी आवश्यक प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव पाठविताना दि. २३ जुलै २०२३ रोजी आयुक्तालय मुंबई येथे मा. संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या तांत्रिक समिती द्वारे निश्चित करण्यात आलेल्या तांत्रिक विनिर्देशांचा विचार करण्यात

आला होता. निश्चित करण्यात आलेल्या तांत्रिक विनिर्देशानुसार GEM पोर्टल वर उपलब्ध असलेले ILR व DF च्या अंदाजित किंमती प्रशासकीय मान्यतेकरीता गृहीत धरण्यात आल्या होत्या. यानुसार नवीन शीत साखळी उपकरणे खरेदी करिता शासन निर्णय, आरोग्य क्र. प्रमाशा-२०२४/प्र.क्र. १९४/आरोग्य-४, दि. २० जून २०२४ नुसार प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली.

प्रशासकीय मान्यतेतील मुद्दा क्र. २ नुसार, सदर तांत्रिक विनिर्देश हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रीतीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी, त्यानंतर याबाबतची खरेदी करण्यात यावी. याप्रमाणे विचार करण्यात आला, त्यावेळी दि. २३ जुलै २०२३ रोजी निश्चित करण्यात आलेल्या तांत्रिक विनिर्देशानुसार शीतसाखळी उपकरणे with Rotomolded Construction केवळ विदेशी बनावटीची बाजारात उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले. याचा विचार करता भारतातील उत्पादकांना खरेदी प्रक्रियेमध्ये भाग घेता यावा यासाठी तांत्रिक विनिर्देशांमध्ये बदल करणे गरजेचे असल्याने केंद्र शासनाच्या उपलब्ध असलेल्या Basic व Generic तांत्रिक विनिर्देशांनुसार मा. आयुक्त, आरोग्यसेवा यांच्या मान्यतेने Contruction (Internal and External) मुद्दया मध्ये बदल करण्यात आला. तदनंतरच निविदा प्रसिद्ध करण्यात आली. निविदा प्रसिद्धीनंतर दि.१५.७.२०२४ रोजी निविदा पूर्व बैठक घेण्यात आली. निविदा पूर्व बैठकी मध्ये विविध कंपन्यांनी सहभाग नोंदविला होता. सहभागी झालेल्या कंपन्यांनी निविदेच्या अटी, शर्ती शिथिल करण्यासाठी व तांत्रिक विनिर्देश मध्ये बदल करण्यासाठी मागण्या केल्या होत्या. यानुसार मा. आयुक्त, आरोग्य सेवा यांच्या मान्यतेने निविदेमध्ये समाविष्ट असलेले तांत्रिक विनिर्देशांत आवश्यक बदल करुन हे केंद्र शासनाच्या उपलब्ध असलेल्या Basic व Generic तांत्रिक विनिर्देशांनुसार अंतिम करण्यात आले. सदर तांत्रिक विनिर्देश हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होणार नाही याची खातरजमा करण्यात आली. संपूर्ण निविदा प्रक्रिया हि शासनाचे सर्व प्रचलित नियमांचे पालन करून तसेच निविदा मसुदा समिती, निविदा मूल्यमापन समिती आणि केंद्रीय खरेदी समिती यांनी वेळोवेळी दिलेल्या मान्यतेनुसारच पूर्ण करण्यात आलेली आहे.

Ice Line Refrigerator निविदा प्रक्रिया मध्ये प्राप्त L१ निविदा धारकाने प्रशासकीय मान्यतेमधील अंदाजित दरांपेक्षा कमी दर सादर केलेले आहेत तसेच Deep Freezer निविदा प्रक्रिया मध्ये प्रशासकीय मान्यतेमधील अंदाजित दरांपेक्षा कमी दर सादर केलेले आहेत. सदर खरेदीमध्ये विविध आरोग्य संस्थांना साहित्याचा पुरवठा करणे, उभारणी करणे व सात वर्षांपर्यंत वॉरंटी कालावधीचा समावेश आहे.

निविदा प्रक्रियेअंती प्राप्त आय.एल.आर. व डिप फ्रिजर यांचे न्यूनतम दर हे निविदेतील तांत्रिक विनिर्देशानुसार केंद्र शासनाच्या Gem पोर्टल वर उपलब्ध असणाऱ्या दरांपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले. Ice Line Refrigerator निविदा प्रक्रिया मध्ये प्राप्त दर हे Gem पोर्टल वर उपलब्ध असणाऱ्या दरांपेक्षा कमी असुन Deep Freezer निविदा प्रक्रिया मध्ये प्राप्त दर हे Gem पोर्टल वर उपलब्ध असणाऱ्या दरांपेक्षा कमी आहेत. सदर खरेदी हि स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवून पूर्ण करण्यात आलेली असून प्राप्त दर हे बाजारभावापेक्षा कमी आहेत. निविदा प्रक्रिया करताना उच्च दर्जाचे आणि केंद्र शासनाच्या तांत्रिक विनिर्देशांनुसार Products प्राप्त व्हावेत या हेतूनेच तांत्रिक विनिर्देश बनविण्यात आले होते. खरेदी प्रक्रियेअंती तांत्रिक विनिर्देशानुसार प्राप्त झालेले ILR हे गोदरेज कंपनीचे व Deep Freezer हे टाटा व्होल्टास-वेस्टफ्रॉस्ट या कंपनीचे आहेत.

माहे जून २०२४ मध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सन २०२४-२५ साठी खर्चाच्या पूरक मागण्या मध्ये नवीन शीत साखळी उपकरणे खरेदी प्रक्रिया राबविणेसाठी एकूण रु. ६२ कोटी ३५ लक्ष इतके अनुदान मंजूर करण्यात आले होते. परंतु रुपये ४३ कोटी ६९ लक्ष इतकी रक्कम निधी वितरणार द्वारे दि. ३१

मार्च २०२५ रोजी उपलब्ध झाले. त्यानुसार विभागास साहित्य प्रत्यक्ष प्राप्त झाल्याची खातरजमा करुन, पुरवठा दाराची विभागाकडे जमा असलेली Security deposit तसेच पुरवठ्यापोटी देणे असलेली २०% रक्कम या सर्व बाबींचा विचार करता पुरवठादारास पुरवठा केलेल्या साहित्याच्या देयकापैकी ८०% रक्कम देयक अदा करण्यात आलेले आहे. पुरवणी मागणी मध्ये प्राप्त झालेले अनुदान ३१ मार्च २०२५ नंतर व्यपगत होते. अनुदान व्यपगत झाल्यानंतर पुन्हा अनुदान मागणी करून अनुदान प्राप्त होण्यासाठी अधिक कालावधी लागण्याची शक्यता असते, या मुद्यांचा विचार करता निविदा मसुदा मधिल मुद्दा "Consignee and Delivery period may change by Direct Demanding Officer" यानुसार संस्थांना पुरविण्यात येणारे Deep Freezer ८० नग व ICE Lined Refrigerator ८३ नग हे एकत्रित रित्या विभागाच्या ताब्यात घेण्यात आले. यानुसार निविदेच्या कोणत्याही अटींचे उल्लघन झालेले नाही. तसेच सदर पुरवठा करण्यात आलेल्या Deep Freezer ८० नग व ICE Lined Refrigerator ८३ नग चे संबंधित आरोग्य संस्थांना पुरवठादारा मार्फत सद्यस्थितीमध्ये सुस्थितीत प्रस्थापित करण्यात आलेले आहेत. Ice Line Refrigerator निविदा करिता पुरवठादराने केलेल्या एकुण ८४१ नग पुरवठ्यापोटी एकुण रु.२०,५५,९६,७०८/- एवढे रक्कमेचे देयक अदा करण्यात आले आहे. तसेच Deep Freezer निविदा करिता पुरवठादरने केलेल्या एकुण ८० नग पुरवठ्यापोटी एकुण रु १,५७,०८,१६०/- एवढे रक्कमेचे देयक अदा करण्यात आले आहे. सदर निविदांच्या खरेदी प्रक्रियेचे तक्रारींच्या अनुषंगाने सदर विषय खरेदी समितीच्या दि. २८.०३.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवण्यात आला. सदर बैठकीमध्ये शीतसाखळी उपकरणांबाबतच्या तक्रारीसंबंधात आयुक्त, आरोग्य सेवा यांनी त्यांचे स्तरावर तपासणी करावी असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार शासनाने दि.२८.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, आरोग्य सेवा यांना सदर प्रकरणाची तपासणी / चौकशी त्यांच्या स्तरावर करण्याबाबत कळविलेले आहे.

लक्षवेधी सूचना क्र.१७६६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. श्याम खोडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७६६ पुढील प्रमाणे आहे:-

"जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला येथील वैद्यकीय अधीक्षक यांनी मनुष्यबळ पुरवठ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अनिमितता करणे, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एस.एन.सी यु मध्ये मनुष्यबळ सपोर्ट सर्विसच्या ई निविदा पोर्टल प्रक्रिया पूर्ण न करता जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला येथे मनुष्यबळ सपोर्ट स्टाफचा बाह्य श्रोतामार्फत ई निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटी पद्धतीने सेवा देणे बंधनकारक असतानाही ही प्रक्रिया राबवताना केवळ जेईएम पोर्टलवर निविदा करणे, या प्रक्रियेमध्ये ३० ते ४० निविदाकारांनी भाग घेतला परंतु त्यातील केवळ चारच निवेदकांना तांत्रिक लिफाफा उघडण्यासाठी सहभागी करून घेणे, त्यापैकीही केवळ दोनच पात्र दर्शविले असणे त्यामुळे दिनांक १/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार कमीत कमी तीन निविदाकरांचे तांत्रिकदृष्ट्या निकष पूर्ण आल्यानंतरच दराचा लिफाफा उघडणे बंधनकारक असताना खामगाव येथील आर्थिक गैरव्यवहार करून प्रचंड मोठा भ्रष्टाचार केलेला असल्याचे निदर्शनास येणे, नियमानुसार निविदा प्रक्रिया रावबीत असताना वैद्यकीय अधीक्षक यांनी आपल्या मर्जीतील व्यक्तीकडून निविदा प्रक्रिया राबवून घेणे, त्यामुळे सदर प्रकरणाची शासनाने दखल घेऊन सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जनतेकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.प्रकाश आबिटकर, मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नवजात शिशू अतिदक्षता विभागासाठी सन २०२४-२५ मध्ये २४ सपोर्ट स्टाफ व जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या अंतर्गत कार्यरत परिचारिका प्रशिक्षण केंद्र येथील ७ सपोर्ट स्टाफ अशा एकूण ३१ सपोर्ट स्टाफचा पुरवठा करणेबाबत नविन ई निविदा प्रक्रिया जेम पोर्टलव्दारे करण्यात आली.सदर निविदा दिनांक

१९/०७/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून निविदा भरण्याचा शेवटचा दिनांक २९/०७/२०२४ हा होता.निविदेमध्ये एकूण ७२ निविदाकारांनी सहभाग घेतला. या ७२ निविदाकारांपैकी साईट सर्वे रिपोर्ट सादर केलेल्या ०४ निविदाकारांची तांत्रिक छाननी करण्यात आली.या ०४ निविदाकारांपैकी एका निविदाकाराला Professional Tax, GST Registration तसेच दुसऱ्या निविदाकाराला ISO ९००,ITR and Professional Tax सादर न केलेबाबत अपात्र ठरविण्यात आले.उर्वरीत दोन निविदाकारांनी सर्व दस्तऐवज सादर केले होते. त्यापैकी एका निविदाकाराला जास्तीचे ISO Certificate असलेबाबत आणि ते स्थानिक असल्यामुळे तक्रारी आल्यास संपर्क करणे सोईचे होत असल्यामुळे, त्यांना पात्र केल्याचे उपलब्ध माहितीवरून दिसून येते व या निविदा प्रकियेला जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अधिनस्थ समितीने मान्यता दिल्याचे दिसून येते. त्यानंतर Gem पोर्टल वर इतर सर्व अपात्र ठरल्यामुळे फक्त एका निविदाकारास पात्र ठरविण्यात आले. यामुळे वित्तीय निविदा एका निविदाकाराची उघडण्यात आली.निविदेला मुदतवाढ देण्यात आलेली नाही.उपलब्ध दस्तेवज तसेच जेम पोर्टल वरील माहितीची पडताळणी केली असता तफावती दिसून आल्यामुळे सहसंचालक (खरेदी कक्ष) आरोग्य सेवा, मुंबई यांच्या दि. १०.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला यांच्या अध्यक्षेतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने चौकशी करुन प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये सदर ई-निविदा प्रक्रिया नियमबाह्य व अतांत्रिक पद्धतीने करण्यात आल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणी जबाबदार असलेल्या जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक व प्रशासकीय अधिकारी यांना निलंबित करून विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८४३पुढीलप्रमाणे आहे. :-

"शासनाचे वित्त विभागाचे कक्ष अधिकारी यांनी त्यांचे पत्र. क्र. रा.स.स.२५/स.क्र.०२ सेवा ३ दि.०५/०३/२५ रोजी चे पत्र उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांना पाठविले असणे, ज्या पत्रामध्ये प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, कर्मचारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाच्या पद श्रृखलेत बदल करणे, व आश्वासित प्रगती योजना तफावत दूर करणे बाबतचा प्रस्ताव आरोग्य विभागास प्राप्त झाला असून सदर ची बाब आपल्या विभागाशी संबंधित असून प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावर निर्णय होऊन अंमलबजावणी करणे बाबत स्पष्ट नमूद असणे, सातत्याने या संबंधाने अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वेळोवेळी मागणी केली असणे, अद्याप पर्यंत हा विषय शासन स्तरावर प्रलंबित असणे, शासनाने तातडीने घ्यावायाचा निर्णय करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश आबिटकर, मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप विभागाकरिता दिनांक 06.08.2007 रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आरोग्य कर्मचारी, आरोग्य निरीक्षक,प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक व अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट क) ही पदोन्नतीच्या साखळीतील पदे आहेत. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी (गट क) या संवर्गातून आरोग्य पर्यवेक्षक (गट क) या संवर्गात पदोन्नती देण्याची तरतूद दि.29.09.2021 रोजीच्या सेवा प्रवेश नियमात विहित करण्यात आलेली आहे. तथापि, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी व आरोग्य पर्यवेक्षक दोन्ही पदाची वेतनश्रेणी समान असल्यामुळे प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदाचे कालबध्द पदोन्नती वेतनात/पदोन्नतीच्या वेतनात कुंठितता येत असल्याने कर्मचारी संघटनांकडून तसेच मा.लोकप्रतिनिधी यांचेकडून वेतन श्रेणीतील त्रृटी दूर करण्याबाबत निवेदने प्राप्त झाली होती.

त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन श्रेणीत सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रृटी निवारण समितीसमोर सादर करण्यात आला होता.

त्याबाबत वित्त विभागाने दिनांक 2 जून, 2025 रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून वेतनत्रुटी निवारण समिती, 2024 च्या अहवालानुसार जिल्हा हिवताप अधिकारी, अवैदकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य (सहायक) निरीक्षक आणि बहूउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) या पदांच्या वेतनश्रेणी मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे या कार्यालयाकडून त्यांच्या दि. 30/06/2025 रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित कार्यालयांना वेतन त्रुटी निवारण समितीच्या अहवालानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

लक्षवेधी सूचना क्रमांक २२३६

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

"श्री.अस्लम शेख,मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२३६ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाकडे कोविड-१९ कालावधी २०१९-२० पासून ते अद्याप कार्यरत कंत्राटी/तदर्थ बी.ए.एम.एस.वैद्यकीय अधिकारी कार्यरत असणे, या वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन सेवेत समावेशन करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या स्तरावर तत्कालीन मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार माहिती संकलीत असून त्याबाबत प्रस्ताव देखील तयार करण्यात आला असणे, परंतु निवडणूक आचारसंहितेमुळे सदर बाब प्रलंबित राहिली असणे, तसेच याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दि.७/१/२०२५ व दि.२४/३/२०२५ रोजी कार्यवाही करणेबाबत सूचना देणे, मात्र त्यावर अद्याप कार्यवाही झाली नसणे, तसेच काही दिवसापूर्वी झालेली एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी नियुक्ती व आता जून, २०२५ महिन्यांत येणारे बंधपत्रित एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी यामुळे सदर बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी कार्यमुक्त होण्याची दाट शक्यता असणे, तरी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांना शासन सेवेत समावेशन करावे, अशी त्यांची मागणी असणे, परंतु शासन करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी या वैद्यकीय अधिकाऱ्यांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सबब शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

श्री.प्रकाश आबिटकर, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रामुख्याने आरोग्य सेवेमध्ये आधुनिक औषधोपचार पद्धती (ॲलोपॅथी) व पारंपारीक भारतीय औषधोपचार पद्धती (आयुर्वेद) या औषधोपचार पद्धतींचा वापर केला जातो. या दोन्ही उपचार पद्धतीमध्ये आरोग्य विभागांतर्गत राज्यस्तरावर वैद्यकीय अधिकारी गट-अ मध्ये एमबीबीएस संवर्गात एकुण ७९३६ पदे मंजूर असून ५४३५ पदे भरलेली आहेत तर २५०१ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (बीएएमएस) संवर्गात ८२८ पदे मंजूर असून ५७१ पदे भरलेली आहेत तर २५७ पदे रिक्त आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिकारी गट-ब मध्ये (बीएएमएस) या संवर्गात १३१८ पदे मंजूर असून पैकी ७०६ पदे भरलेली तर ६१२ पदे रिक्त आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आपीएचस मानांकन निश्चित करण्यात आले आहेत. त्याअंतर्गत आधुनिक औषधोपचार पद्धती (ॲलोपॅथी) व पारंपारीक भारतीय औषधोपचार पद्धती

(आयुर्वेद) या दोन्ही अंतर्गत सेवा दिल्या जाणा-या आरोग्य संस्थांकरीता सदर मानांकन निश्चित करण्यात आलेले आहेत. राज्यामध्ये सर्व आरोग्य संस्थांच्या आकृतीबंधामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

बीएएमएस तदर्थ/कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कोविड-१९ कालावधी २०१९-२० पासून कार्यरत आहेत. कंत्राटी/तदर्थ बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांचे समावेशन करण्याबाबत विविध निवेदने/पत्रे शासनास प्राप्त झाले आहेत.

यापूर्वी विभागाच्या दिनांक ०२/०२/२००९ च्या अधिसुचनेनुसार ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता अस्थाई स्वरुपात कार्यरत असलेल्या एमबीबीएस अर्हताधारकांचे वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावर समावेशन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ११/०१/२०१९ रोजीच्या अधिसुचनेनुसार अस्थाई बीएएमएस वैद्यकीय अधिकारी गट-ब यांचेही समावेशन करण्यात आले आहे.

राज्यामध्ये आरोग्य विभागांतर्गत बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत देण्यात येणा या सेवा या पर्यायी सेवा म्हणून अपेक्षित नाहीत. कारण रुग्णालय स्तरावर व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर दिल्या जाणा-या सेवांमध्ये आधुनिक औषधोपचार पद्धती (ॲलोपॅथी) चा वापर केला जातो. त्यामुळे त्या ठिकाणी एमबीबीएस / तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता असते. अशा पदांवर बीएएमएस वैद्यकीय अधिकारी हा पर्याय असू शकत नाही. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर तात्पुरती व्यवस्था म्हणून मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीद्वारे ११ महिन्यासाठी शासन निर्णय दि. ४ जुलै २०१९) कंत्राटी/तदर्थ बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांचे कंत्राटी पध्दतीने नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत नियुक्त्या केल्या जातात.

मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय बाबतचे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८ ऑगस्ट २००५ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये "अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्याला विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा कर्मचा-यांनी नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे" असे नमुद केलेले आहे. तसेच तात्पुरत्या अस्थाई कर्मचा-यांनी नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करण्यात येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे असे निर्देश शासनाने दिनांक शासन पत्र दि. ०६/०३/२०२४ अन्वये दिलेले आहेत.

शासन निर्णय आदेश क्र. कंत्राटी-२०२३/प्र.क्र.५९०/सेवा-३/दि.११ सप्टेंबर, २०२३ अन्वये सार्वजानिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथगिक आरोग्य केंद्रात) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गातील रिक्त पदे नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत बंधपत्रित एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवारांमधून भरण्यात यावीत. त्यानंतर सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. अर्हताधारकांमधून भरण्यात यावीत. त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे कंत्राटी पध्दतीने बी.ए.एम.एस अर्हताधारकांमधून त्या ठिकाणी नियमित वैद्यकीय अधिकारी अथवा बंधपत्रित एम.बी.बी.एस. अर्हताधारक अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत असे नमुद आहे.

तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेले एमबीबीएस किंवा बीएएमस तदर्थ वैद्यकीय अधिकारी जर त्या आरोग्य संस्थेत बंधपत्रीत वा नियमित एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी नियुक्त झाल्यास कंत्राटी / तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा समाप्त केल्या जातात. सध्यस्थितीत नवीन पदभरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

****